परस्परं भावयन्तः
म प्र
मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र
# हितगुज
अंक १३० ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ जून २०२२
Website : www.marathepratishthan.org
(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना***
***माझा स्नेहपूर्वक नमस्कार.***

ग्रीष्म, असह्य उन्हाळ्याचा ऋतू संपला आहे. वर्षाऋतूची आपण सर्व चातकाप्रमाणे आतुरतेने वाट पहात आहोत. धरणीमाता तापली आहे, अंगाची लाही लाही होते आहे. घामाच्या धारा अंगातून निथळत आहेत. त्यामुळे गळून गेल्यासारखा थकवा जाणवतो आहे. अशा निरूत्साही वातावरणातही समाधानाचे, सुखाचे क्षण येतात. कोकिळेचे मंजूळ कुजन, मोगऱ्याचा, सोनचाफ्याच्या, पारिजातकाच्या फुलांचा दरवळ, कैरीचे पन्हे, रसराज हापूस आंबा, थंड पाण्याची आंघोळ, प्रातः काली उद्यानात फिरायला जाणे, रात्री संगीताची मैफल ऐकणे, 'ज्ञानेश्वरी'चा माऊलीचा सहवास इ. गोष्टी सुखदायक वाटतात आणि उन्हाळ्याचा रखरखीतपणा कमी करतात. असो.

'हितगुज' छापील स्वरूपात न येता आता ई अंक स्वरूपात निघतो आहे. ज्येष्ठ कुलबांधवांना हा ई अंक वाचायला त्रास होतो म्हणून काही ज्येष्ठ व श्रेष्ठ कुलबांधव-भगिनींनी मराठे प्रतिष्ठानच्या अध्यक्षांकडे आपली ही अडचण सांगितली. त्यावर अध्यक्षांनी तोडगा काढला आणि 'हितगुज'ची झेरॉक्स प्रती काढून 'हितगुज'चा १२९ वा मार्च महिन्याचा अंक कुलबांधवांना वाचायला उपलब्ध करून दिला. आपल्या मराठे परिवाराच्या ज्येष्ठ, श्रेष्ठ कृतीशील सौ. नीलांबरी ताईंनी त्या अंकाचे उत्साहवर्धक, जोरदार स्वागत केले आहे. त्यांना तो 'हितगुज'चा झेरॉक्स अंक वाचून खूपच मानसिक समाधान मिळाले आणि त्यांनी ते पत्र रूपाने पाठवून आपली प्रतिक्रिया लागलीच कळविली. या अंकात 'वाचकांचा पत्रव्यवहार' सदरात ती छापली आहे. वाचनीय आहे. आणि नीलांबरीताईंचा हा अभिप्राय आम्हा मराठे कार्यकारिणीतील काम करणाऱ्या सदस्यांना प्रेरणादायी आहे. मला ही 'संपादकीय' लिहिण्याला त्यामुळे बळ मिळाले. नाही तर अलिकडे मरगळ आल्यासारखे वाटत होते, पण नीलांबरीताईंच्या पाठिंब्यामुळे उत्साह वाढला. असो.

साप्ताहिक 'किरात' हे कै. अनंत वासुदेव मराठे यांनी वेंगुर्ल्यात वृत्तपत्र प्रतिकुल परिस्थितीत १९२२ साली सुरू केले आज जानेवारी २०२२ मध्ये साप्ताहिक किरातने शंभरी गाठली आहे. मराठ्यांच्या चार पिढ्या कै. अनंत वासुदेव तथा अण्णा मराठे त्यांचे सुपुत्र कै. केशव अनंत तथा बाबा मराठे त्यांचे सुपुत्र कै. श्रीधर केशव मराठे या मराठ्यांच्या तीन पिढ्यांनी 'किरात'ला दर्जेदार आणि लोकप्रिय वाचनीय दर्जा दिला. त्याच परंपरेत, सध्या विद्यमान संपादिका सौ. सीमा शंशाक मराठे या किरातचा हा वारसा पुढे चालवित आहेत. त्यांनी आपल्या समर्थ संपादिकत्वाखाली 'किरात शताब्दी विशेष अंक' प्रकाशित केला आहे. श्री. सुनील मराठे, मेघःश्याम मराठे यांचेही योगदान आहे. 'किरात'ला मराठे प्रतिष्ठानच्या खूप खूप शुभेच्छा. यापुढेही 'किरात'ची अशीच यशोदायी वाटचाल सुरू राहील हे निश्चित कारण किरातचा पायाच मजबूत आहे. असो.

आषाढी एकादशी-गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा!

आपली शुभचिंतक
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),
(दि. ३ जून, २०२२)
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२/८४३३६ ७४८२७

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ९८२०२३२०८२ ● इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

# लोकशाहीचा चौथा खांब

• यशवंत मराठे (पृ.३९९), माहिम

भ्रमणध्वनी : ९८२००४४६३०

आपण माध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ मानतो. वृत्तपत्रांचा आपल्या स्वातंत्र्य लढ्यात सिंहाचा वाटा होता. त्याकाळी जनमत बदलायचे व त्याचे चळवळीत रूपांतर करावयाचे काम वृत्तपत्रांनी चोख बजावले. कारण, तेव्हा विश्वासार्हता हे त्यांचे सगळ्यात मोठे भांडवल होते. खरे, खोटे करताना पूर्वी ठामपणे साक्षी ठेऊन सांगितले जायचे की हे वृत्तपत्रात छापून आले आहे म्हणजे सत्यच असणार. ह्याच बरोबर समाज प्रबोधन हा सुद्धा वृत्तपत्रांचा प्रमुख उद्देश होता.




बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' नावाचे पहिले मराठी वर्तमानपत्र ६ जानेवारी १८३२ साली प्रकाशित केले. म्हणजेच या क्षेत्राचा इतिहास जवळ जवळ १९० वर्षे इतका जुना आहे. नंतरच्या काळात लोकमान्य टिळक, आचार्य अत्रे, गोविंदराव तळवळकर, निळूभाऊ खाडिलकर अशा दिग्गजांनी हा वसा तसाच सुरू ठेवला.

आज भारतात एक लाखाच्यावर वर्तमानपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके आणि मासिके प्रकाशित होतात. अगदी आपल्या मराठीतच अंदाजे २५ मोठी वर्तमानपत्रे आहेत आणि देशभरात सुमारे २२ भाषांमधून अंदाजे २५ कोटी लोकांपर्यंत वृत्तपत्रे पोहोचतात.

पूर्वी अशी एक समजूत होती की वृत्तपत्र हातात असले म्हणजे जनमत आपल्या बाजूने वळवता येते आणि त्या अनुषंगाने इतर व्यवसाय देखील करता येतात. त्यामुळे हे क्षेत्र भांडवलदारांचे आणि राजकारण्यांच्या उत्पन्नाचे मोठे साधन झाले होते आणि त्याचा परिपाक म्हणजे सगळी मिडिया हाऊस ही बड्या बड्या धेंडांच्या अधिपत्याखाली गेली.

गेल्या दहा वर्षात घडलेला दुसरा एक मोठा बदल म्हणजे सोशल मिडिया. आज संपूर्ण जगाचे व्यक्त होण्याचे माध्यम सोशल मिडिया झालाय. असं आपण म्हणू शकू. पूर्वी कोणालाही व्यक्त व्हायचे असेल तर वर्तमानपत्र हे एकच माध्यम होते. परंतु, आज सोशल मिडियामुळे प्रत्येकाला व्यक्त होण्याची संधी मिळू लागली. जणू प्रत्येक जण स्वतःच 'वार्ताहर' आणि 'पत्रकार' झालाय. व्हॉट्सॲप, फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर अशा अनेक माध्यमातून तरुण वर्ग आपापली मते मांडू लागला आणि त्यामुळे वृत्तपत्रांची गरजच एक प्रकारे कमी झाली.

दिवसागणिक फोफावत जाणारा डिजिटल मिडिया हा प्रिंट मिडियाला विळखा घालेल का? हा प्रश्न जगभरातील विश्लेषकांना भेडसावतो आहे. १९९५ नंतर वर्तमानपत्रांची थोडीफार पीछेहाट होऊ लागली आणि त्याचे प्रमुख कारण टीव्ही, न्यूज चॅनल्स. त्यांच्या 'लाईव्ह न्यूज' आणि 'ब्रेकिंग न्यूज' जास्त प्रकर्षाने पाहिल्या जाऊ लागल्या. कारण, वर्तमानपत्र हे फक्त सकाळी येणार. आता जेव्हापासून 'पेड न्यूज' सुरू झाल्या आहेत, तेव्हापासून वर्तमानपत्राची तसेच टीव्ही न्यूज चॅनल्सची विश्वासार्हता पार रसातळाला गेली आहे. पूर्वी पत्रकारांचा एक दबदबा असायचा. एक प्रकारचा सन्मान दिला जायचा त्यांना; परंतु आज ते काही अंशी संपत चालल्याची स्थिती आहे.

जसजसा कागद, छपाई, पत्रकार, कर्मचाऱ्यांचे वेतन आणि इतर खर्च वाढू लागला तसतसे वृत्तपत्र चालवणे कठीण होऊ लागले आणि मग जाहिराती मिळवण्याशिवाय दुसरा पर्याय राहिला नाही. त्यामुळे हळूहळू समाज निष्ठा संपुष्टात येऊ लागली. वृत्तपत्र हे आता निव्वळ जाहिरातींचा धंदा झालाय जणू आणि त्याचा परिपाक म्हणजे जाहिरातींसाठी वाट्टेल ते करण्याची तयारी आणि त्यातून कहर म्हणजे गेल्या दोन वर्षातील कोरोनाने केलेले सर्वांचे पुरते वस्त्रहरण! असेच चित्र दिसतंय.

या सर्व पार्श्वभूमीवर जानेवारी २०२२ मध्ये 'किरात' या

वृत्तपत्राने शंभरीत पदार्पण केले ही खरंच अभिमानाची गोष्ट आहे. वेंगुर्ल्यासारख्या छोट्या गावातून तळ कोकणातील विविध प्रश्नांवर जनप्रबोधन करण्याचा वसा ‘किरात’ने आजवर जोपासला आहे. कोकणातील एक दर्जेदार साप्ताहिक म्हणून ‘किरात’ने नावलौकिक प्राप्त केला आहे. ‘किरात’ आणि वेंगुर्लेकरांची तसेच सर्व चाकरमान्यांची भावनिक नाळ जुळलेली आहे. मला ‘किरात’ मध्ये काही लेख लिहिण्याची संधी मिळाली आणि मिळणाऱ्या प्रतिक्रियांवरून मी असे ठामपणे म्हणू शकतो की, वाचकांचे ‘किरात’वर निस्सीम प्रेम आहे.




माझे आजोबा, कै. अप्पासाहेब मराठे हे मूळचे वेंगुर्ल्याचे आणि त्यामुळे आमचे पहिल्यापासून ‘किरात’करांशी घरोब्याचे संबंध. कै. श्रीधर मराठे कधीही मुंबईत आले की आमच्या ‘मराठे उद्योग भवना’मध्ये त्यांची एक फेरी ठरलेली असे. त्यांच्याच अथक परिश्रमामुळेच मर्यादित संसाधने असून देखील ‘किरात’ची प्रगती होत राहिली. आता त्यांचे बंधू श्री. मेघःश्याम आणि सून सौ. सीमा यांनी हा वारसा अतिशय यशस्वीरित्या घेतला आहे. त्यांच्याच पुढाकाराने आजच्या तांत्रिक युगात वेबसाईट, युट्यूब चॅनेल, फेसबूक अशा माध्यमांद्वारे ते त्याचा विस्तार करता आहेत.

आपल्या देशात जवळजवळ ६७ कोटी लोकांकडे इंटरनेट आहे आणि आज मोबाईलमुळे संपूर्ण जगातील ई-पेपर आपल्या हातात उपलब्ध झालेत, आणि ते सुद्धा फुकटात. आज सारा प्रिंट मिडिया डिजीटल युगाकडे धाव घेतोय. आज भारतातील सर्व प्रमुख वर्तमानपत्रे ई-पेपर म्हणून वाचता येऊ शकतात. त्यामुळे साहजिकच वर्तमानपत्रांचे प्रमुख जाहिरातदार सुद्धा आता डिजिटल व सोशल मिडियाकडे वळू लागलेत आणि आता जाहिराती देखील बहुतेक वेबसाईटवर उपलब्ध झाल्यात.

सद्यकाळात जास्त करून ४०-४५ वयोगटाच्या पुढील लोकंच वृत्तपत्र हातात घेतात. तरुण पिढीला त्याचे पूर्ण वावडे आहे असे म्हटले तरी अजिबात धाडसाचं होणार नाही. टाळेबंदीच्या काळात वृत्तपत्र नसले तरी अडतंच असं नाही अशी वाचकांची धारणा होऊ लागली आहे. त्यामुळे एकप्रकारे वृत्तपत्रे वाचायची लोकांची गरज संपली आहे की काय असं वाटण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. वृत्तपत्र क्षेत्राला कोरोनारूपी दृष्ट लागली का?

डिजिटल युगामुळे आधीच वृत्तपत्रांचा खप कमी होऊ लागला आहे आणि त्यात जाहिराती नाही मिळाल्या तर उद्या कदाचित वृत्तपत्रांचा आर्थिक कणाच मोडकळीला येईल. आज लोकशाहीचा हा चौथा खांब सरकारच्या जाहिरातींवर कसाबसा तग धरून उभा आहे. पण या कोरोनाच्या संकटात सरकारचे खजिने रिक्त होऊ लागलेत. अशा परिस्थितीत जर सरकारने उद्या वर्तमानपत्राला जाहिराती देण्याचे बंद करण्याचे ठरवले तर आज जो काही थोडाफार बुडत्याला काडीचा आधार मिळतोय तो देखील संपुष्टात येईल. त्यामुळे या वातावरणात वृत्तपत्रांचे भविष्य सद्यस्थितीत तरी अंधूक व धुसर दिसतंय.

जागतिकीकरणाच्या जीवघेण्या स्पर्धेत अनेक धंदे संपलेत. आता ती वेळ प्रिंट मिडियावर येऊन ठेपली आहे असा एक सूर सध्या जाणवतो. कोरोनाच्या महापुरात किती व्यवसाय तग धरून उभे राहतील हे येणारा काळच ठरवेल. एअरलाईन्स, ट्रॅव्हल अँड टुरिझम, हॉटेल, रेस्टॉरंट यांच्याबरोबरीने वृत्तपत्रांना सुद्धा घरघर लागेल का? बऱ्याच जाणकारांच्या मते आणखी पाच-सात वर्षांनी वृत्तपत्रे इतिहास जमा होतील.

अशा अवघड काळात आपण वाचकांनी ‘किरात’ सारख्या विश्वासार्हता जपणाऱ्या वृत्तपत्राला जगवलं पाहिजे. कारण ‘किरात’ हे फक्त साप्ताहिक म्हणून मर्यादित राहिले नसून सामाजिक उपक्रम राबविणारी सामाजिक संस्था आहे. म्हणूनच हा लोकशाहीचा चौथा खांब ताठ मानेने उभा राहायला हवा ही आपली सर्वांची जबाबदारी आहे ती आपण नीट निभावून नेली तरच ‘किरात’चे संस्थापक कै. अनंत वासुदेव मराठे, कै. केशव अनंत मराठे आणि कै. श्रीधर केशव मराठे यांना खरी श्रद्धांजली होईल.

yashwant.marathe@gmail.com

❖

# उद्योजक हा देशासाठी निर्माण करतो संपत्ती

*‘निर्माण’ ग्रुपचे सीईओ व एमडी तथा सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टचे विश्वस्त डॉ. अजित मराठे यांचे प्रतिपादन*

• श्री. अजित श्रीराम मराठे (पृ.४२८)

**को**णताही उद्योजक हा आपल्या उद्योग आणि व्यवसायातून जी प्रगती करतो. पैसा कमावतो तो वरकरणी व्यक्तीगत दिसत असला तरी यातून स्वतःसोबतच देशासाठीही तो संपत्ती निर्माण करीत असतो. कारण उद्योगाशी संबंधित विविध घटकांना त्यातून जसे काम मिळते तसेच पैशांचे चलनवलनही वाढते. त्यामुळे मराठी युवकांनी टिपिकल नोकरीच्या मागे न लागता व्यवसाय-उद्योग करावा आणि आपल्या सोबतच देशाचीही भरभराट करावी असा समृद्धीचा सल्ला पुणे येथील निर्माण ग्रुपचे सीईओ व एमडी तथा सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टचे विश्वस्त डॉ. अजित मराठे यांनी तरुण भारत भेटीत दिला.

शनिवारी त्यांनी तरूण भारत कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. त्यावेळी सहकाऱ्यांशी त्यांनी बातचीत करताना उद्योजकतेचे महत्त्व विशद केले. प्रारंभी माधव बहुउद्देशीय प्रतिष्ठानचे सचिव सचिन वोरसे, निवासी संपादक दिनेश दगडकर आणि व्यवस्थापक मनोज महाजन यांनी पुष्पगुच्छ आणि तरुण भारतचे विशेषांक देवून त्यांचे स्वागत केले.

एका मध्यमवर्गीय महाराष्ट्रीयन कुटुंबात जन्म झालेल्या डॉ. अजित मराठे यांचे वडिल आणि आई शिक्षक होते. त्यांचे बालपण पुण्यातच गेले. त्यांच्यावर तेथे संघाचे संस्कार घडले. त्याच संस्कारातून पुढे कोल्हापूर जिल्ह्यात दोन वर्षे ते संघाचे प्रचारकही होते.

पुण्यात विजयनगर येथे रहात असताना एकदा ईशीसु कंपनीच्या ऑटोमॅटिक गाडीतून माझा मित्र मला घ्यायला आला. ती गाडी पाहण्यासाठी आमच्या वाड्यासोबतच आजूबाजूचे रहिवासीही मोठ्या कौतुकाने त्या गाडीकडे पाहत होते. ही घटना माझ्या मनावर घट्ट कोरली गेली आणि त्या दिवशीच ठरवलं की, आपणही खूप मोठं व्हायचं, श्रीमंत व्हायचं, संपत्ती कमवायची आणि अशाच गाडीतून फिरायचं, असे सांगून डॉ. अजित म्हणाले की, त्यासाठी ८ तासांची नोकरी करून भागणार नव्हतं त्यामुळे नोकरीच करायची नाही अशी मनाशी पक्की खूणगाठ बांधली.

### पहिली कमाई ८ हजार रूपये

पेण येथून सिव्हील इंजिनिअरिंगमध्ये बी.ई. केल्यावर बालमित्र राजेंद्र सावंत याच्यासोबत इंटेरियर डिझायनिंगचे काम सुरू केले. तेव्हा पेंटिंगच्या कामाबद्दल मिळालेले ८००० रुपये ही पहिली कमाई. हे काम करताना लक्षात आले की, आपल्या शिक्षणाचा येथे फारसा उपयोग नाही.

### १९९५ ला व्यवसाय प्रारंभ

राजेंद्र सावंत सोबत मिळून १९९५ मध्ये अवघ्या २५ हजारात व्यवसाय प्रारंभ केला, असे सांगून डॉ. अजित मराठे म्हणाले की, उद्योगातून आपण समाजाचं लोकांचं चांगलं करू शकतो. चांगलं केलं की त्यातून पैसाही मिळतोच. मात्र केवळ पैसे कमवायचे नाही तर सर्वांना सोबत घेऊन चालायचे हे ठरवून आम्ही काम करीत होतो. या संदर्भात काही वाचनही झाले होते. त्यातच लार्सन आणि टुब्रो म्हणजेच एलएन्डटी सिमेंटच्या मालकांबद्दल वाचनात आले. हे दोघे मित्र १९४६-४७च्या सुमारास भारतात मशिनरीचे काही पार्ट विकण्यासाठी आले होते. त्यांना कळले की, भारत स्वतंत्र होतोय. आता यांना मशिनरींची गरज पडेल म्हणून पार्ट विकण्यापेक्षा येथेच कंपनी स्थापना करायची असा त्यांनी निर्णय घेतला आणि या जगविख्यात कंपनीचा भारतात उदय झाला. त्यातही विशेष म्हणजे, कंपनीचे शेअर त्यांनी घरच्या एकाही व्यक्तीला न देता कर्मचाऱ्यांच्या नावे केले. ते वाचल्यावर मी व मित्र राजेंद्र खूप प्रभावित झालो आणि त्याचक्षणी आम्ही निर्णय घेवून निर्माण ग्रुपची स्थापना केली. पुढे त्याचे नामकरण ‘निर्माण रिॲल्टर्स डेव्हलपर्स बिल्डर्स’ असे झाले. निर्माण हा शब्दच खूप भारदस्त आहे आणि या ग्रुपचे वैशिष्ट्य म्हणजे आम्ही पैशापेक्षा नातं-रिलेशनशिप अधिक जपतो, असेही ते म्हणाले.

### शिवाजी महाराज हे आदर्श

ही सर्व कामे करतांना ज्यांचे व्यक्तिमत्त्व मोठे आणि अनुकरणीय असूनही त्यांनी लहान म्हणूनच जगणं पसंत केले त्या सर्वांना मार्गदर्शक म्हणून डोळ्यासमोर ठेवले होते. उदाहरणच द्यायचे तर रतन टाटा, नारायण मूर्ती- ज्यांची उद्योजक होण्याआधी खूप पुस्तके वाचली होती. तसेच, आदर्श होता तो छत्रपती शिवाजी महाराजांचा ज्यांनी मराठी माणसाला जमवून स्वराज्य निर्माण केले होते आणि आजही सर्वांना एकत्र बांधून ठेवले आहे.

# माधव भिडे यांचा परिसस्पर्श

याच दरम्यान एका कार्यक्रमासाठी वक्ते हवे होते. त्यासाठी माधव भिडे मिळाले तर उत्तमच- असा विषय एका मित्रासमोर मांडला असता त्याने भिडे माझ्या ओळखीचे आहेत, मी त्यांची पुस्तके वाचली आहेत असे सांगून तुमची भेट घडवतो म्हणत त्यांना फोन लावला आणि विषय सांगितला. त्यांनी माझे नाव ऐकताच द्या त्याला फोन म्हणत ते माझ्याशी बोलले आणि मला चक्क भेटायलाच बोलावले. त्या दिवसापासून माधव भिडे नामक परिसस्पर्श मला झाला आणि माझ्या आयुष्याचे जणू सोने झाले असेही ते म्हणाले. कारण मराठी माणसाने उद्योगात यायला हवे असे ते आग्रहाने म्हणत. त्यांचे ब्रीदवाक्यच होतं की, 'एकमेका सहाय्य करू, अवघे होऊ श्रीमंत'. यातूनच आमची ओळख वाढत गेली आणि त्यांनी स्थापन केलेल्या 'सॅटर्डे क्लब'शी मी जोडला गेलो. त्यांना मी एकदा विचारलेही होते की, हे नाव कसे ठरवले. त्यावर त्यांनी सांगितले की, सॅटर्डे म्हणजे शनिवार हा न कर्त्याचा वार मानला जातो. त्यामुळे आपण हेच नाव स्वीकारू आणि इच्छा असणाऱ्यांना उद्योग-व्यवसायाकडे वळण्यासाठी मदत करू. यातूनच या क्लबची स्थापना झाली. या दिवशी सर्व मराठी उद्योजक एकत्र येऊन आपल्या व्यवसाय-उद्योगविषयी अनुभव आदान-प्रदान करतात. याचा फायदा सर्वांनाच होतो. जून २०१० मध्ये आम्ही या क्लबला सुसंघटित करायचे ठरवून त्याची रीतसर स्थापना आणि कार्यकारिणी तयार केली. ती आजतागायत सुरळीत सुरू आहे. हा क्लब मानसिकता बदलविण्यासाठी सहाय्य करतो. त्यासाठी त्या-त्या व्यवसायाशी निगडीत उद्योजक, मार्गदर्शक तसेच व्यवसायासाठीचे भांडवल कुठून व कसे उभे करायचे याबाबत मार्गदर्शन केले जाते. सध्या महाराष्ट्रात या क्लबचे २५०० सभासद आहेत. असेही त्यांनी सांगितले.

**रि-डेव्हलपमेंटमध्ये अधिक काम**

काही तरी करायचं, मोठं व्हायचं म्हणून रि-डेव्हलपमेंटमध्ये शिरलो. अनेक नवनवीन उद्योजक, त्यातून होणार त्रास आणि मीही यात नवीन असा काहीसा ताळमेळ बसत नव्हता. पण महाराजांचा गनिमी कावा स्वीकारला आणि त्या आधारावर आजपर्यंत टिकून आहोत. असेही त्यांनी सांगितले.

**ब्रॅण्डचे महत्त्व असे कळले**

काही तरी मोठं करायचं हा हेतू मनात असतांनाच त्यासाठी आयपीओ आवश्यक असल्याने त्या अनुषंगाने प्रयत्न करता त्यासाठी वेगवेगळ्या कंपन्या नको तर एकच कंपनी हवी, ज्याचा टर्न ओव्हर अधिक असेल. त्यासाठी सर्वांना एकत्र आणलं आणि यातून शिकायला मिळाले की, जो एकाच विशिष्ट विषयाला टार्गेट करतो तोच या क्षेत्रात मोठा उद्योजक बनू शकतो. उदा. हिरानंदानी-ज्यांनी पवई कॉम्प्लेक्स उभारला आणि मगरपट्टा सिटी ज्यांच्या नावाचे आज ब्रँड आहे. ते याच माध्यमातून मोठे झाले. आता पुण्याजवळील नांदेड येथील रहिवासीही याच पद्धतीने डेव्हलपमेंटसाठी प्रयत्नात आहेत. यात ना जागा विकली जाते ना कुणी भुमीहीन होतो असेही ते म्हणाले.


**मॅनेजमेंटमध्ये पी.एच.डी.**

उद्योगाच्या ब्रॅण्डच्या अभ्यासात एक गोष्ट लक्षात आली की, ग्राहकांना ब्रॅण्डचे महत्त्व एकदा पटले की ते कायमस्वरूपी जोडले जातात. याच अनुषंगाने खूप वाचन, निरीक्षणे, चर्चा आणि मान्यवरांनी केलेल्या मार्गदर्शनाचे फलित म्हणजे माझी पीएच. डी. असे सांगून डॉ. अजित म्हणाले की, माझ्या प्राध्यापकांच्या सूचनेवरून मी पुढे मुंबई विद्यापीठातून 'ब्रॅण्ड इक्विटी मॅनेजमेंट' या विषयावर प्रबंध सादर केला आणि मला पीएच.डी. मिळाली अशा विषयावर एखाद्या इंजिनिअरने मॅनजमेंटची पीएच.डी. मिळवणारा मुंबई विद्यापीठातील कदाचित मी पहिला असावा असेही ते म्हणाले.

**जळगावचा क्लबही वैशिष्ट्यपूर्ण**

येथील 'सॅटर्डे क्लब' ही वैशिष्ट्यपूर्ण असून या माध्यमातून काही ना काही उपक्रम सुरूच असतात. जळगावात सुमारे ५० सभासद आहेत. आता तर 'सॅटर्डे क्लब' मध्ये महिलांचीही विंग सुरु झाली असून त्या माध्यमातून मराठी उद्योजिकांना प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन केले जाते. या ग्रुपने नुकताच इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च सोबत एम.ओ.यु. केलाय. जळगावात उद्योग भरारीही सुरु आहे, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी सेंटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टचे छबिराज राणे आणि विनीत जोशी उपस्थित होते.

❖




'मराठे प्रतिष्ठान'चे जेष्ठ सभासद श्री. संजय खांबेटे यांनी 'How to save Income tax' हे पुस्तक लिहिले असून पुणे येथे २८ फेब्रुवारी २०२२ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेवेळी सर्व उपस्थितांना सदर पुस्तक मोफत वितरण लेखक श्री संजय खांबेटे यांचेकडून करण्यात आले. मराठे प्रतिष्ठान तर्फे खूप खूप आभार!

# नियतीचे मायाजाल

• श्री. शरद कृष्णाजी मराठे
भ्रमणध्वनी : ९८६९०२७३९९

माझ्या सर्व जवळच्या,
प्रिय जनांसाठी,

**माझी पत्नी सौ. सुप्रिया–सौ. जया हिचा द्वितीय स्मृती दिन व माझा सुपुत्र चि. समीर यांला जगातून जाऊन ३४ वर्षे होत आहेत.**

*एकदा फुललेलं फुल, पुन्हा कधी फुलत नाही*
*एकदा मिळालेला जन्म, पुन्हा मिळत नाही*
*एकदा हे जग सोडून गेलेली माणसे पुन्हा मिळत नाहीत*
*तसेच जिव्हाळ्याचे ऋणानुबंध असल्याशिवाय,*
*कोणी कोणाच्या आयुष्यात येत नाही.*

या दोन्ही वाक्यांचा धागा पकडून, माझी पत्नी सौ. जया हिच्या दुसऱ्या स्मृती दिना निमित्त व माझा सुपुत्र चि. समीर हे जग कायमचे सोडून गेला त्याला ३४ वर्षे होत आहेत त्याबाबत थोडेसे.

आज ९ एप्रिल हा माझ्या आयुष्यातील एक वेदनांनी, दुःखांनी भरलेला व सर्वात अप्रिय दिवस. ह्या दिवशी माझी प्राणप्रिय पत्नी, जी देवाने मला जगातील सर्वांत सुंदर देणगी दिली व माझ्या समीरच्या रूपाने सुद्धा मला जगातील दुसरी सर्वांत सुंदर देणगी मिळाली होती. त्या दोन्ही देणग्या नियतीने माझ्याकडूनपरत घेतल्या, माझी कन्या सौ. स्वप्ना, नाती, चि. स्मृती व चि. सृष्टी आणि जावई श्री. किरण, सर्व मराठे, जोशी आणि डोळस कुटुंब यांना सोडून गेलीच त्याशिवाय निस्सीम प्रेम करणाऱ्या सर्वच्या सर्व तिच्या चाहत्यांना, प्रियजनांना, स्नेह्यांना सोडून गेली ती कायमची परत न येण्यासाठी. या कल्पनेने सुद्धा अंगावर काटा उभा राहतो, थरथरी भरते व मनांत विचारांचे काहूर माजते. आणि ९ एप्रिल हा दिवस उजाडला की मनांत चीड, घृणा, व विषण्णता निर्माण होते. वास्तविक प्रत्येक ९ एप्रिलला माझ्याप्रमाणेच आपल्या सर्वांची सुद्धा अवस्था थोड्याफार फरकाने अशीच होत असणार हे मला माहित आहेच.

असे करत करत मनावर दगड ठेवून आता प्रत्येक ९ तारीख आपल्या सारख्या सर्व प्रेमळ व जवळच्या माणसांच्या आधाराने कशीतरी निभावतोय. समाजात असे म्हटले जाते की, नियतीच्या खेळाप्रमाणे हे सर्व घडत राहणारच. प्रत्येकावर आज ना उद्या अशी वेळ यावयाचीच असते. हे जरी सूर्यप्रकाशाएवढे सत्य असले तरी ज्याला हे सहन करावे लागते त्याला हे वियोगाचे दुःख सहन करणे म्हणजे एक भयंकर प्रसंग असतो. अर्थातच हे सर्व एकमेकांच्या प्रेमावर अवलंबून असते. पण येथे आपण सर्वांचेच प्रेम असते असे गृहीत धरुनच बोलू या.

माझ्या जयाला हे जग सोडून जावून दोन वर्षे झाली आहे तरी सुद्धा दुःख, वेदना, विरह, बेचैनी, आठवणी आणि मनांवर झालेल्या जखमा तिळभर ही कमी झालेल्या नाहीत. त्या रोजच्या रोज जश्याच्या तश्याच आहेत.

असे म्हटले जाते की, काळ हे सर्व दुःखावरचे रामबाण औषध आहे. ह्याबद्दल मी ०९/०४/२०२० ते ०९/०४/२०२१ ह्या दरम्यान दर महिन्याला माझे मनोगत लिहित होतो. त्यावेळेस बऱ्याच लोकांचे मेसेजेस येते होते, रिप्लाय येत होते व मला असेच लिहित जा म्हणून सांगत होते व एखाद्या महिन्याला ९ तारीख उजाडली आणि मनोगत पाठविण्यास वेळ झालेला असला तर लगेच फोन येत असत.

परंतु, आता दुसऱ्या वर्षाचा स्मृती दिन सुद्धा मी ह्याच वाक्यावर म्हणजे सर्व दुःखांवर काळ हे रामबाण औषध आहे यावर लिहित आहे. माझ्या अनुभवावरून मला असे लिहावे असे वाटते की सर्व दुःखांवर काळ हे औषध नसते. कारण जसजसा काळ जातो तसतसा पती–पत्नीच्या बाबतीत बोलायचे झाले तर कोणी मागे राहतो तर कोणी पुढे जातो. मग नंतर त्यांच्या अडचणी अधिक बळावतात व वाढत जातात. जसे एकमेकाला आधार, सोबत–संगत, व प्रेमाचा शब्द ह्या गोष्टींची नितांत आवश्यकता असते. तसेच कांही गंभीर आजार झाला तर जोडीदार शिवाय दुसऱ्या कोणाचाही आधार वाटत नाही. कांही वेळा कोणाच्या कोणाच्या बाबतीत तो मिळणे ही शक्य नसते. अशा वेळी काय करावयाचे, भले बराच काळ लोटला किंवा गेला तरी जोडीदाराची जागा कोणीतरी घेऊ शकणार आहे कां? मग काळ हे कसे औषध होऊ शकते? शिवाय वय वाढत गेले की, कदाचित आपल्याला कांही करता येत नाही, फिरता येत नाही, मनाला विरंगुळा नसतो, अवयव थकतात, मन थकते, शरीर थकते अशावेळेस जोडीदार नसेल तर काय करावयाचे? जसा जास्त काल जातो तशी आधाराची जास्त आवश्यकता असते,

अशावेळेस, अशा परिस्थितीत कसे जगावयाचे? म्हणजेच काय काळ गेला तरी काय उपयोग! समस्या वाढत जातात. म्हणजे काळ गेला तरी दुःख कधीही कमी होत नाही. तर उलट वाढते. उदाहरण द्यावयाचेच झाले तर घरातून निघताना त्याला किंवा तिला निरोप द्यायला कोण असते? आलो तर स्वागताला कोण नसते. वेदना सांगायला कोण नसते. सुखदुःख वाटून घ्यावयास कोणी नसते. अश्रू पुसायला व समजून घ्यावयाला कोणीही नसते.


ज्यांना मुले बाळे नसतात त्यांना हे प्रश्न अधिकच भेडसावतात. परंतु काहींना मुलेबाळे असली तरी ती नेहमीच जवळ असतातच असे नाही. हे प्रश्न कुणाच्याही बाबतीत असू शकतात, व ते अनुत्तरीतच राहणार, ह्याच्यावर ब्रह्मदेवाकडेच कदाचित उत्तर असू शकते पण तो आपल्या सारख्या सामान्य माणसांना कधीच उत्तर देत नाही, हीच तर खरी आपली समस्या आहे. मग उत्तर कोणाकडे मागावयाचे हे आपल्या कुणालाच कधी समजण्यापलीकडचे आहे आणि शेवटी काय त्याला किंवा तिला वियोगाचे दुःख कितीही काळ गेला तरी सहन करणे अटळ असते किंवा भाग पडते.

माझ्या बाबतीत बोलावयाचे झाल्यास मला पुत्र वियोगाचे दुःख सहन करावे लागत आहे. ही आणखीनच माझी शोकांतिका आहे. पुत्र वियोगाचे दुःख आम्ही दोघांनी म्हणजे माझी पत्नी सौ सुप्रियाने व मी २७/०१/१९८८ ते ०९/०४/२०२०, ३२ वर्षे एकत्र भोगले. परंतु आता ०९/०४/२०२० नंतर एवढा मोठा काळ लोटल्यानंतर एकट्याला भोगावे लागणे ह्या सारखी जगात कुठलीही शोकांतिका नसते. ते माझ्या वाट्याला आले आहे. असे दुःख सोसण्याची वेळ कुणावरही अगदी आपल्या शत्रूवर सुद्धा येऊ नये.

शेवटी आपण सर्व नेहमीप्रमाणे परमेश्वराजवळ एकच प्रार्थना करू शकतो. जो पर्यंत आपण ह्या जगात आहोत तोपर्यंत माझा समीर व माझी पत्नी सौ. जया जेथे कुठे असतील तेथे सुखी, आनंदी व समाधानी राहू देत, हीच प्रार्थना.

आपला,<br>
श्री. शरद कृष्णाजी मराठे<br>
मो.क्र. ९८६९०२७३९९

## सहवेदना



स्व. सौ. सुषमा मोहन मराठे यांचे दुःखद निधन दि.१९/०९/२०२१ भाद्रपद शु. त्रयोदशीला शनिवारी झाले, अशी ता. १८ पण डॉक्टरने सर्टिफिकेट १२.१५ ला रात्री दिले म्हणून १९ ता. असो. वयाच्या सत्तराव्या वर्षी कर्करोगाने निधन झाले, सत्तर वर्षात ती आजारी पडली नाही, आजार कळलाच नाही व दहा महीन्यात सर्व संपले, नियतीपुढे आपण हतबल आहोत,

माहेरची ज्ञानेश्वरी महादेव जोशी, माहेर बडोद्यात, शिक्षण पॉलिटेक्निक डिप्लोमा इलेक्ट्रीकल, दोन वर्ष, सामाजिक प्रवृत्तीत भरपूर योगदान व तेही संसार व्यवस्थित सांभाळून, ऊत्तम गृहिणी, सुग्रण, मराठी, संस्कृत भाषेचे सखोल ज्ञान, शीघ्र कवि व मंगलाष्टक तयार करण्यात हातखंडा, लग्न मुहुर्ताच्या १० मिनिटा अगोदर तयार केली आहेत, माहेरच्या सासरच्या सर्व नातेवाईकांशी संबंध पन्नास वर्षांपासून टिकवून ठेवणारी, गृहकृत्यदक्ष, स्वच्छतेची आवड व टापटीप बघत राहावी, आहे त्या परिस्थितीत नीट राहाणे ही आईवडीलांची शिकवण स्वतःत जोपासलीच पण मुलींनाही तसेच संस्कार दिले. भानूमति स्टोर्स (महिल सहकारी उद्योग मंदीर लि.) ह्या महिला चालवत असलेल्या संस्थेत अध्यक्ष उपाध्यक्ष पदे २४,२५ वर्षे सांभाळत संस्थेचा भरपूर उत्कर्ष होण्यास हातभार लावला. ब्राह्मणसभेच्या महालक्ष्मी, चैत्रगौरी, हळदीकुंकु समारंभात पुढाकार घेऊन दिलेली जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडणारी, थोडक्यात अष्टपैलू व्यक्तिमत्व.

**– मोहन विष्णुपंत मराठे,** (पृ.४२२)<br>
*बडोदे, गुजरात*

# प्रत्येक बापानं वयात येणाऱ्या प्रत्येक मुलाला आवर्जून लिहावं असं पत्रं...!!

नक्की वाचा आणि पटलं तर आपल्या वयात येणाऱ्या मुलांनाही वाचायला द्या. फक्त एकदा नाही तर पुन्हा पुन्हा वाचा आणि पुन्हा पुन्हा वाचायला सांगा.... !!

पुन्हा पुन्हा एवढ्यासाठी की ज्यावेळी जसा मूड असेल तसा प्रत्येक वेळी वेगळा अर्थ समजून येईल...!!

माझ्या लाडक्या मुला. मी हे असं तुला पत्र लिहितोय बघ, वाच, आणि ठरव....!!

जगणं, नशीब आणि अपघात या तीन गोष्टी कधी घडतील-बिघडतील सांगता येत नाही. सगळंच अतर्क्य! आपण अमुक इतके दिवस जगू हे कुणी सांगू नाही शकत. त्यामुळे काही गोष्टी वेळेवर बोललेल्या बऱ्या...!!

मी बाप आहे तुझा, मी तुला जे सांगेन ते इतर कुणी कदाचित कधीच नाही सांगणार..!!

मी माझ्या आयुष्यात ज्या चुका केल्या त्या तुला टाळता आल्या तर तुझे कष्ट, जिवाचे चटके आणि मनाचा त्रास बराच कमी होईल, म्हणून काही गोष्टी तुला सांगतोय...!!

माणसांविषयी मनात आकस ठेवू नको, कुणाचा द्वेष करू नकोस. तुझ्याशी कायम चांगलंच वागलं पाहिजे अशी इतर लोकांवर काही आपण सक्ती नाही करू शकत. त्यामुळे ते असंच का वागतात असं म्हणून तणतणू नको. तुझ्याशी कायम चांगलं वागण्याची जबाबदारी फक्त माझी आणि तुझ्या आईचीच आहे. जेंव्हा जी माणसं तुझ्याशी चांगलं वागतात, त्यांच्याशी तु चांगलं वाग. पण हे कायम लक्षात ठेव की प्रत्येक माणूस प्रत्येक गोष्ट कुठल्या ना कुठल्या हेतूपोटी करतो. त्यामुळे जी माणसं गोड बोलतात, तुझ्याशी कायम चांगलीच वागतात त्यांना तू खरंच आवडतो असं काही नसेलही. जरा माणसं तपासून बघ, पटकन मित्र बनवून पूर्ण विश्वास टाकण्याची घाई करू नकोस...!!

जगणं कशानेच कुणामुळेच थांबत नाही. त्यामुळे माणसं तुला सोडून जातील. नाकारतील, झिडकारतील किंवा ज्यांच्यावर तू जीव तोडून प्रेम केलंस तेच तुझ्या आयुष्यातून निघून जातील. तेव्हा हेच कायम लक्षात ठेव की, कुठल्याही माणसामुळे आपलं जगणं थांबत नाही. कधीच नाही...!!

आयुष्य फार छोटं आहे आणि तीच तुझी खरी पुंजी आहे. त्यामुळे आज वाया घालवलास तर उद्या कदाचित जगणंच तुला सोडून जाईल. त्यापेक्षा आज मनापासून, भरभरून जग. आनंदी राहा...!!

प्रेम ही एक क्षणिक आणि चंचल भावना आहे. ती काळाप्रमाणे आणि मूडप्रमाणेही बदलते. ज्यांच्यावर तू जिवापाड प्रेम करतोस तेच समजा तुला सोडून गेले तर जरा धीर धर. काळाच्या मलमानं या जखमाही भरून निघतील. प्रेमात पडलास म्हणजे तेच सगळ्यात सुंदर आणि अतीव चांगलं असं समजू नकोस आणि प्रेमभंग झाला म्हणून त्या दु:खालाही जास्त कवटाळून बसू नकोस...!!

अनेक यशस्वी माणसांनी शिक्षण अर्धवट सोडलं, तरी ते यशस्वी झाले अशा कहाण्या तू वाचल्या असशीलच ! पण याचा अर्थ असा नाही की, एक शिक्षण सोडलं की तूही यशस्वी होशील. नॉलेज, ज्ञान हे एक शस्त्र आहे हे लक्षात ठेव. शून्यातून स्वर्ग निर्माण करता येतो हे खरंय, पण कुठल्या तरी शून्यापासून आधी सुरुवात तर करायला लागतेच ना...!!

माझी अपेक्षाच नाही की मी म्हातारा झाल्यावर तू मला सांभाळावंस. मी ही तुला जन्मभर पोसणार नाहीच. तू स्वत:च्या पायावर उभा राहू शकशील तोर्पयत तुला सपोर्ट करणं ही माझी जबाबदारी. त्यानंतर तुला बसमधून फिरायचं की लिमोझीनमधून, गरीबच राहायचं की श्रीमंत व्हायचं हा निर्णय तुझा तू घ्यायचा...!!

आणखी एक, मी ही अनेकदा लॉटरीचं तिकीट काढलं, ते कधीच लागलं नाही. एका रात्रीत श्रीमंत होता येत नाही. श्रीमंत व्हायचं तर मेहनत करावीच लागते. जगात फुकट कधीच काहीच मिळत नाही. ..!!

बाळा कदाचित तुला हे पाठविलेले पत्र आवडेल की नाही हे माहीत नाही पण हे पत्र तुझ्या आयुष्याची शिदोरी नक्की बनेल हे मात्र पक्कं. म्हणुन बाळा हे पत्र तुला आवडो वा ना आवडो लगेच फेकुन देऊ नकोस या पत्राला तु नेहमी तुझ्या सोबत ठेव व वेळ मिळेल तेंव्हा पुन्हा पुन्हा वाच.....!!

**फक्त तुझेच वडील**

लेखांक २

# इच्छापत्र : अपरिहार्य पण दुर्लक्षित दस्तावेज

• श्रीनिवास मराठे (पृ.३९२), दादर, मुंबई
भ्रमणध्वनी : ९८३३२१६४६८

**कोणी आणि कशासाठी इच्छापत्र करावे?**

हे थोडंसं कुसुमाग्रजांच्या 'प्रेम कुणावर करावं' या कवितेसारखं वाटण्याची शक्यता आहे. नव्हे आहेच! कारण या कवितेप्रमाणेच खरंतर कुणीही आपलं इच्छापत्र करावं. विशेषतः ज्याच्यापाशी विभाजनायोग्य मालमत्ता आहे व ज्या व्यक्तींची देणी (Liabilities) मालमत्तेपेक्षा (Assets) कमी आहेत आणि ज्याच्यापश्चात त्याच्या मालमत्तेसंदर्भात विवाद निर्माण होऊ शकतात अशा प्रत्येक व्यक्तीने इच्छापत्र करणे कायद्याने बाध्य नसले तरीही अत्यावश्यक आहे. देणी (Liability) वैयक्तिक अथवा व्यावसायिक प्रकारची असू शकतात. अशा देण्यांची परतफेड ही इच्छापत्राद्वारे मिळालेल्या, किंवा त्याअभावी, हिंदू वारसाहक्क कायद्याने मिळणाऱ्या संपत्तीतून, Class I किंवा त्याअभावी Class II किंवा त्याअभावी Agnates किंवा त्याअभावी Cognates याप्रकारच्या वारसांवर किंवा व्यक्ती जर अन्यधर्मीय असेल तर त्या त्या धर्माच्या वारसाहक्क कायद्यांनुसार बंधनकारक असते. (या चारही प्रकारच्या वारसांविषयी अधिक माहिती परिशिष्ट 2 मध्ये दिली आहे). मात्र व्यावसयिक देण्यांच्या बाबतीत कुशल युक्तीवादाद्वारे काही सवलत मिळण्याची शक्यता जरी असली तरी विनोदाने असे म्हणावेसे वाटते की एकूणच, देणी मालमत्तेपेक्षा जास्त असणाऱ्या अशा व्यक्तीच्या वारसांनी त्यांना दिवाळखोरीचा सल्ला तरी द्यावा नाहीतर त्यांच्या इच्छापत्रात सहभाग नसल्याचा निर्णय तरी त्यांना कळवून टाकावा.

भारतीय वारसाहक्क कायदा 1925 मध्ये नमूद केल्याप्रमाणे मानसिक संतुलन असलेली आणि अवयस्क (Minor) नसलेली कोणतीही व्यक्ती आपले इच्छापत्र करू शकते. या अन्वये स्वतःचे राहते घर आणि/वा आपल्या देण्यांच्या तुलनेत पुरेशी संपत्ती असलेली, मानसिकदृष्ट्या संतुलित परंतु अवयस्क नसलेली कोणतीही व्यक्ती आपल्या मालमत्तेच्या, मृत्युपश्चात विभाजनाविषयी इच्छापत्र करण्यास सक्षम आहे. पहा: https://indiacode.nic.in/handle/123456789/2385?locale=en

लवकरात लवकर, म्हणजे जेव्हा व्यक्ती विभाजनायोग्य मालमत्तेची धनी होते तेव्हा किंवा उशिरात उशिरा म्हणजे, ज्या वयाचं भांडवल करून हितशत्रू असलेले वारस मानसिक संतुलनाबाबत शंका व्यक्त करू शकणार नाहीत, अशा वयात आपले इच्छापत्र करणे शहाणपणाचे ठरते. आपल्या संपत्तीवरून वारसांमध्ये आपसात होऊ शकणारी कटुता किंवा संघर्ष टाळावयाचे असतील तर इच्छापत्र करणे हा एकमेव मार्ग आहे. सतत बदलत्या कुटुंबव्यवस्थेमुळे, किमान या एका कारणासाठी तरी आपले इच्छापत्र करण्याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज अधिक प्रकर्षाने जाणवू लागली आहे.

**वारसाहक्क कायदे/ विविध कायद्यांतील तरतुदी:**

इच्छापत्र नसल्यास किंवा काही कारणाने ते अवैध ठरल्यास मालमत्तेचे विभाजन हे त्या त्या धर्माच्या व्यक्तिगत वारसाहक्क कायद्याद्वारे होत असते. केवळ या एका कारणाने अशा कायद्यांच्या तरतुदींविषयी माहिती असणे गरजेचे आहे आणि म्हणून हे पुढील विवेचन!

**विनाइच्छापत्र मृत पुरुष व्यक्तींसाठी**

1. भारतासारख्या सर्वधर्मसमभाव असलेल्या देशात अशा प्रकारचे बहुसंख्य 'व्यक्तिगत कायदे' (Personal Laws) हे केवळ धर्माधारितच नव्हेत तर विविध राज्यात वेगवेगळे आणि बहुशः लिंगभेद मानणारे आहेत. यात विवाहविषयक, वारसाहक्क, वडिलार्जित संपत्ती विभाजन विषयक आणि विशेषतः स्त्रीसंदर्भातील कायदे हे या श्रेणीत येतात. अर्थात दुर्दैवाने या सर्व कायद्यांचा गाभा हा व्यक्तीची मालमत्ता हा नसून त्याचा धर्म आणि लिंग हाच असतो.
2. बहुतेक कायदे हे इंग्रजांच्या काळातील आहेत आणि त्यात स्वातंत्र्य मिळाल्याला 70 वर्ष होऊनही सुधारणा झालेली नाही. यामुळेच हिंदू, पारशी, ख्रिश्चन, मुस्लिम ह्या धर्मातीलच नव्हे तर इतर वांशिक जमातीतील प्रथा आणि रीतीभाती यांना सांभाळून त्यांची जी रचना केली गेली होती, स्त्रियांनाही जे गौण स्थान दिलं गेलं होतं तेच अजूनही अबाधित आहे.
3. यास अपवाद आहे 'हिंदू वारसाहक्क (संशोधित) कायदा

2005' ज्यात हिंदू स्त्रियांना वडिलोपार्जित मालमत्तेत समान हक्क दिला गेला आहे.

4. इतर काही धर्मियांचे वारसाहक्क 'भारतीय वारसाहक्क कायदा 1925' द्वारे गठित केले गेले आहेत. उदा.
   i) ख्रिश्चन व ज्यू व्यक्तींसाठी : कलम 31 ते 49;
   ii) पारशी धर्मीय व्यक्तींसाठी : कलम 50 ते 56;
   iii) इच्छापत्र केलेल्या आणि तत्कालीन प. बंगाल, मुंबई आणि मद्रास इलाक्यांत स्थावर मालमता असलेल्या हिंदू व्यक्तींच्या संदर्भातील तरतुदी;
5. मुस्लिम व्यक्तिगत (शरियत) कायदा 1937: विनाइच्छापत्र मृत पावलेल्या मुस्लिम व्यक्तींच्या वारसाहक्क विषयक तरतुदी;
6. विशेष विवाह कायदा (Special Marriages Act) 1954 : आंतरधर्मीय विवाह केलेल्या व्यक्तिंविषयीचा कायदा;
7. हे व असेच इतर काही कायदे हे विनाइच्छापत्र मृत पावलेल्या पुरुष व्यक्तींच्या वडिलोपार्जित तसेच स्वकष्टार्जित मालमत्तेच्या वारसाहक्कांच्या बाबतीतील तरतुदींविषयी आहेत.
8. प्रामुख्याने हिंदू पुरुष व्यक्तींविषयीच्या कायद्यातील काही तरतुदी अशा आहेत:
   हिंदू व्यक्तींच्या वारसांचे चार प्रमुख प्रकार गणले आहेत वर्ग 1 (Class I), वर्ग 1 (Class II), सगोत्र (Agnates) आणि सजातीय (Coganates). पैकी वर्ग 1 मध्ये पत्नी, आई, पुत्र / कन्या, पुत्रांच्या पश्चात त्यांच्या पत्नी (जीवित नसल्यास त्यांची अपत्ये), कन्यांच्या पश्चात त्यांची अपत्ये (जीवित नसल्यास त्यांची अपत्ये) अथवा दत्तक व्यक्ती (त्यांच्या पुढील पिढीतील व्यक्ती सुद्धा) येतात. वर्ग 2 मध्ये वडील, काका, आत्या, आई व वडील या दोन्हीकडचे आजोबा व आजी तसेच भाऊ बहिणी व त्यांच्या पुढच्या पिढीतील व्यक्तींची अपत्ये आणि त्यांची अपत्ये तसेच पुढील पिढीतील स्त्रियांची अपत्ये यांचा समावेश होतो. सगोत्र व्यक्ती म्हणजे मृत व्यक्तीचे भाऊ (सख्खे अथवा सावत्र तसेच चुलत / चुलत चुलत भाऊ) वा त्यांच्या पत्नी (विधवा नव्हेत) वा त्यांची पुरुष अपत्ये. सजातीय म्हणजे मृत व्यक्तीच्या बहिणी (सख्ख्या अथवा सावत्र तसेच चुलत / चुलत चुलत बहिणी) वा त्यांची अपत्ये. वारसाहक्क या चार वर्गांच्या वरील क्रमाप्रमाणे ठरवला जातो. म्हणजे सर्वात पहिला हक्क वर्ग 1 च्या वारसांचा, ते कोणीही हयात नसतील तर वर्ग 2 च्या वारसांचा, तेही कोणीही हयात नसतील तर सगोत्र वारसांचा व तेही हयात नसतील तर सजातीय वारसांचा. या पैकी कोणीही नसेल किंवा हयात नसेल तर विनाइच्छापत्र मृत व्यक्तीची सर्व मालमत्ता सरकारजमा करण्याची तरतूद आहे.
9. वडिलोपार्जित मालमत्तेची व्याख्या अशी आहे : पुरुष व्यक्तीच्या पूर्वीच्या तीन पिढ्यांतील पुरुष व्यक्तींमध्ये विना विभाजन वारसा हक्काने चालत आलेली मालमत्ता. अशा मालमत्तेत प्रत्येक पिढीतील पुरुष व्यक्ती आपल्या पित्याच्या हिश्श्याच्या मालमत्तेत पित्याला जितके मुलगे असतील त्या संख्येच्या प्रमाणात वारसा मिळतो. उदा. A या विनाइच्छापत्र मृत व्यक्तीला B आणि C हे दोन मुलगे असतील तर B आणि C यांचा हिस्सा प्रत्येकी 50%. त्यानंतर B ला एक आणि C ला एक मुलगा व एक मुलगी असतील (B चा J आणि C चे K आणि L) तर J ला Bचा पूर्ण 50% हिस्सा आणि K आणि L यांना C च्या 50% हिश्श्यात प्रत्येकी निम्मा म्हणजे 25% (अर्थात B आणि/ किंवा C च्या मृत्यू नंतर).
10. आपल्या वडिलांकडून विनाइच्छापत्र वारसाहक्काने म्हणजेच विना विभाजन (without Partition) आलेल्या हिश्श्याची वाटणी कोणीही व्यक्ती इच्छापत्राद्वारे करू शकत नाही.
11. स्वकष्टार्जित मालमत्ता म्हणजे स्वतःच्या अर्थार्जनातून खरेदी केलेली मालमत्ता. केवळ अशा किंवा वडिलोपार्जित मालमत्तेच्या विभाजना (partition) द्वारे मिळालेल्या मालमत्तेचे वाटपच व्यक्ती आपल्या इच्छापत्राद्वारे करू शकते. मात्र स्त्रियांनी करावयाच्या इच्छापत्रासंबंधित नियम वेगळे आहेत. त्यांचा उहापोह यानंतर स्वतंत्रपणे करण्यात आला आहे.
12. हिंदू वारसाहक्क (संशोधन) कायदा 2005 कलम 10 अन्वये पत्नीशिवाय इतर वारस हयात नसल्यास मृत व्यक्तीची सर्व मालमत्ता पत्नीस जाईल अन्यथा हयात असलेले वर्ग 1 चे वारसदार (पत्नी, आई व इतर अपत्ये) यांच्यात समान हिश्श्यात विभागली जाईल. पहा: http://ncwapps.nic.in/acts/TheHinduSuccessionAct1956.pdf

**विविध वारसाहक्क कायद्यांनुसार स्त्रियांचे अधिकार:**

1. हिंदू वारसाहक्क (संशोधन) कायदा 2005 तील तरतुदींप्रमाणे मुलीला पित्याच्या अविभाजित वडिलोपार्जित मालमत्तेत इतर भावांप्रमाणे समान हक्क मिळतो. यापूर्वीच्या म्हणजे हिंदू वारसाहक्क कायदा 1956 च्या तरतुदींप्रमाणे मालमत्तेतील हिस्सा मिळण्याचा स्त्रीला हक्क नव्हता. अर्थात इच्छापत्राद्वारे पिता आपल्या स्वकष्टार्जित संपत्तीची वाटणी आपल्या इच्छेनुसार करु शकतो. अगदी सर्व मालमत्ता

मुलीला देऊ शकतो. वरील कायदयानुसार मिळणारे हक्क कन्या 9 सप्टेंबर 2005 च्या पूर्वी जन्मली असेल तरीही, अर्थात पूर्वलक्षी प्रभावाने मिळू शकतात. मात्र पित्याचा मृत्यू विनाइच्छापत्र व 2005 च्या नंतर असेल तरच. पहा: https://economictimes.indiatimes.com/wealth/plan/inheritance-rights-of-women-how-to-protect-them-and-how-succession-laws-vary/articleshow/70407336.cms

2. हा संशोधित कायदा 9 सप्टेंबर 2005 पासून लागू झाला. पिता जर या तारखेनंतर विना इच्छापत्र मृत झाला असेल तर या कायद्याने दिलेले सर्व अधिकार मुलीला ती या तारखेआधी किंवा नंतर जरी जन्माला आली असेल तरी मिळतात.
3. सर्वोच्च न्यायालयाच्या फेब्रुवारी 2018 च्या निर्णयाद्वारे पित्याच्या मृत्युच्या वेळी कन्या मृत असेल तरी तिच्या वारसांना तिच्या हिश्श्याची वाटणी मिळेल.
4. विवाहित हिंदू स्त्रीचे स्त्रीधन (विवाहप्रसंगी मिळालेले दागिने/भेटी) ही तिची एकटीची मालमता असते. त्या मालमत्तेचे आपल्या मर्जीनुसार वाटप करण्याचा तिला पूर्ण अधिकार असतो.
5. तसेच पतीकडून, आणि एकत्र कुटुंब असल्यास अशा कुटुंबाकडून, आधार, आसरा आणि देखभाल होण्याचा, अधिकार प्रत्येक विवाहित स्त्रीला असतो.
6. घटस्फोट न घेता विभक्त झालेल्या पतीने दुसरा विवाह केल्यास असा विवाह बेकायदेशीर ठरतो. त्यामुळे अशी पुरुषव्यक्ती विनाइच्छापत्र मृत झाल्यास अशा द्वितीय पत्नीस कोणताही वारसाहक्क मिळत नाही तर प्रथम पत्नीचे वारसाहक्क अबाधित असतात.
7. विभक्त झालेल्या पत्नीच्या पोटगीच्या अधिकाराबद्दल निर्णय घटस्फोटाच्या खटल्याद्वारे होतो. पण विनाइच्छापत्र मृत व्यक्तीच्या विभक्त झालेल्या पत्नीस वारसाहक्क मिळत नाही.
8. आंतरधर्मीय विवाह असल्यास पत्नीचे वारसाहक्क हे पतीच्या धर्मातील तरतूदीनुसार असतात. समजा एका हिंदू मुलीने धर्मांतरण न करता मुस्लिम पुरुषाशी विवाह केला तर तिचा विवाह वैध किंवा आंतरधर्मीय विवाह गणला जात नाही. त्यामुळे तिला मुस्लिम धर्मियांप्रमाणे मेहेर मिळाला तरी पतीच्या मालमत्तेत वारसाहक्क मिळत नाही.
9. ख्रिश्चन पतीची पत्नी विवाहापूर्वी कोणत्याही धर्माची असली तरी तिला पतीच्या मालमत्तेत एक तृतीयांश हिस्सा मिळतो व दोन तृतीयांश हिस्सा अपत्यांना मिळतो. अपत्ये नसतील तर 50% हिस्सा पत्नीस व उर्वरित 50% त्याच्या इतर वारसांना मिळतो. पहा: https://www.moneycontrol.com/news/business/personal-finance/viewpoint-dear-woman-write-a-will-to-ensure-your-wealth-doesnt-go-to-undeserving-hands-4147641.html
10. मुस्लिम व्यक्तिगत कायदयानुसार कुराण, सुन्ना इझामा आणि किया या चार तत्वांनी वारसाहक्क ठरवला जातो. इच्छापत्राद्वारे मुस्लिम पुरुष व्यक्ती आपल्या केवळ एक तृतीयांश मालमत्तेचीच वाटणी करू शकतो. उर्वरित दोन तृतीयांश मालमत्ता इतर वारसांमध्ये समप्रमाणात वाटली जाते. पुरुष आणि स्त्रिया दोघेही वारस गणले जात असले तरी स्त्रीला पुरुषाच्या निम्मा हिस्साच मिळतो. म्हणजेच कन्येला पुत्राच्या निम्मा हिस्सा मिळेल. मृताला अपत्ये नसतील तर मृताच्या आईला एक तृतीयांश हिस्सा मिळतो अन्यथा एक षष्ठांश हिस्सा मिळतो. पत्नीस अपत्ये नसल्यास एक चतुर्थांश हिस्सा मिळतो.मात्र एकाहून अधिक पत्नी असल्यास त्यांच्यात हा हिस्सा समप्रमाणात वाटला जातो. पहा: https://en.wikipedia.org/wiki/Islamic_inheritance_jurispridence
11. ख्रिश्चन धर्मीयांमध्ये पुरुष प्रथम पत्नीच्या मृत्युनंतर अथवा तिच्याशी घटस्फोट झाल्यानंतरच दुसरा विवाह करू शकतो. जर प्रथम पत्नी घटस्फोटीत नसेल आणि जीवित असेल तर द्वितीय पत्नीला वारसाहक्क मिळत नाही. मुलगी आणि मुलगा दोघांना आपल्या पित्याच्या मालमत्तेत समान वारसा हक्क मिळतो. पुरुष व्यक्ती विनापत्य मृत झाली तर त्याच्या आईला त्याच्या पत्नीचा हिस्सा दिल्यानंतर उर्वरित मालमत्तेत इतर सर्व वारसांप्रमाणे समान हक्क मिळतो.

**न्याय पालिका:**

1. मालमत्तेच्या हस्तांतरणाबाबत, मग ते वारसाहक्काने असेल किंवा इच्छापत्राद्वारे, काही विवाद निर्माण झाल्यास दाद मागण्यासाठी न्यायपालिकेत योग्य ती व्यवस्था आहे.
2. इच्छापत्रासंबंधित व प्रोबेट संबंधी पिटीशन आदी मामले Testamentory न्यायालयापुढे चालतात.
3. तसेच यात किंवा वारसाहक्कांसंबंधात विवाद झाल्यास संबंधित व्यक्ती न्यायप्रणालीतील इतर न्यायालये म्हणजे सत्र न्यायालये ते सर्वोच्च न्यायालय याद्वारे न्याय मिळवू शकतात.

***(क्रमश:)***


लेखांक ३

# इच्छापत्र : अपरिहार्य पण दुर्लक्षित दस्तावेज

• श्रीनिवास मराठे (पृ.३९२), दादर, मुंबई भ्रमणध्वनी : ९८३३२१६४६८

**इच्छापत्र लिखाणासाठी मार्गदर्शक तत्वे: (कसे लिहावे)**

1. प्रचलित कायद्यानुसार कोऱ्या कागदावर लिहिलेलं इच्छापत्र देखील ग्राह्य मानलं जातं.
2. कर्त्याच्या हस्ताक्षरात असलेल्या इच्छापत्राच्या विश्वासार्हतेबद्दल खरंतर खात्री असायला हवी. परंतु कर्ता वयस्क असल्यास त्याच्या हस्ताक्षराबद्दल आक्षेप घेतला जाऊ शकतो. अर्थात लिहितांना हात कापत नसेल तर हस्ताक्षर तज्ज्ञांकडून सत्यतेविषयी पडताळणी करता येऊ शकते. मात्र तसे असले तरी अशा पडताळणीचा निष्कर्ष विरुद्ध आल्यास न्यायालयाद्वारे इच्छापत्र नाकारले जाऊ शकते. त्यामुळे शक्यतो टंकलिखित इच्छापत्र करणेच चांगले.




3. चेन्नई, कोलकाता आणि मुंबई या महानगरांत लिहिलं गेलेलं आणि/ किंवा या महानगरांतील स्थावर मालमत्तांच्या विभाजनाविषयी प्रावधान असलेल्या इच्छापत्रांचे प्रोबेट घेणे आवश्यक आहे, कर्त्याचा मृत्यू कुठेही झाला असला तरी. (भारतीय वारसाहक्क कायदा 1925 च्या कलम 57 अन्वयेकेवळ हिंदू व्यक्तींसाठी)पहा: https://vakilsearch.com/advice/probate-mandatory-transfer-property/
4. आपल्या इच्छापत्राच्या योग्य अंमलबजावणीसाठी आपल्या आणि लाभार्थींच्या विश्वासातील जवळच्या व्यक्तीस व्यवस्थापक म्हणून नेमणे श्रेयस्कर. अशी व्यक्ती शक्यतो कर्त्यापेक्षा वयाने किमान 20/25 वर्षे लहान असल्यास उत्तम! म्हणजे कर्त्याच्या पश्चात ती व्यक्ती हयात असण्याची शक्यता प्रबळ असते. अशा प्रकारे काम करण्यासाठी कायद्याने जरी नसली तरी त्या व्यक्तीची संमती घेणे जसे आवश्यक असते तसेच या कामासाठी योग्य तो मोबदला देणे देखील!
5. आजकाल व्यावसायिक रित्या हे काम करणाऱ्या संस्था (यातील काही नामांकित बँकांशी किंवा वकिली व्यवसायाशी (Advocates) संबंधित असतात) या बाबतीत सक्रिय आहेत. हल्ली इच्छापत्र Online करणारी संकेतस्थळेही आहेत. अशा प्रकारे इच्छापत्र केल्यास पक्षपातीपणाच्या आरोपाची शक्यता जवळजवळ नाहीच! इच्छापत्राचा मसुदा व ते अस्तित्वात येण्यापर्यंतची त्यांची बिदागी अत्यल्प असली तरी त्याच्या अंमलबजावणीसाठी ती बऱ्याच जास्त प्रमाणात (एकूण मालमत्तेच्या मूल्यांकनाच्या 1% ते 5% पर्यंत-प्रासंगिक खर्च वेगळे) असू शकते. मात्र अशी देणी कर्त्याच्या मृत्युनंतर, लाभार्थींची होणार असलेल्या त्याच्या मालमत्तेतूनच दिली जातात. त्यामुळे कर्त्याने त्याची काळजी करण्याचं काहीच कारण नाही.
6. एखादा लाभार्थी देखील व्यवस्थापक म्हणून चालू शकेल. पण मग त्याच्या नेमणुकीला आव्हान मिळण्याची शक्यताच जास्त असेल. त्यामुळे हे टाळावे.
7. व्यवस्थापकाने काम पाहण्यास काही कारणाने नकार दिला किंवा त्याचा मृत्यू झाला तर अशा परिस्थितीत कोर्ट पर्यायी व्यवस्थापक नेमू शकते. पण अशा अनोळखी व्यक्तीस लाभार्थी स्वीकारणार नाहीत ही शक्यता गृहीत धरून कर्त्यानेच पर्यायी व्यवस्थापक नेमणे श्रेयस्कर.
8. व्यवस्थापकास देण्यात येणाऱ्या मोबदल्याविषयी इच्छापत्रात स्पष्ट उल्लेख असावा. (शक्यतो टक्केवारीच्या स्वरुपात)
9. व्यवस्थापकाच्या कार्याची स्पष्ट व प्रचलित कायद्याशी विसंगत अशा कोणत्याही प्रकारच्या तरतुदी नसलेली कक्षा आखून देणे गरजेचे. (विशेषतः भारतीय वारसाहक्क कायदा 1925 आणि हिंदू वारसाहक्क कायदा अधिनियम 1956 आणि हिंदू वारसाहक्क कायदा (संशोधन) अधिनियम 2005).
10. इच्छापत्रात उल्लेखित लाभार्थीचे निधन कर्त्याच्या आधी झाल्यास आणि कर्त्याने इच्छापत्रात त्यानुसार योग्य तो बदल न केल्यास त्याच्या हिश्शाचे वाटप त्याच्या वारसात होऊ शकत नाही. या कारणाने पर्यायी लाभार्थीचा उल्लेख अनिवार्य होतो.
11. इच्छापत्र रद्दबातल होण्याची शक्यता टाळण्यासाठी कर्ता आणि साक्षीदार यांची पूर्ण नावे आणि पत्ते नमूद असणे

आवश्यक आहे. साक्षीदार शक्यतो कर्त्याच्या तुलनेत वयाने बरेच तरुण, शिक्षित आणि शक्यतो कायद्यातील खाचाखोचांचा अनुभव असलेले असावेत. यामुळे, इच्छापत्राच्या संदर्भात काही कायदेशीर प्रक्रिया झाल्यास, ते तोपर्यंत हयात असण्याची आणि त्यास समर्थपणे तोंड देऊ शकण्याची शक्यता अधिक असेल. साक्षीदारांचे ओळखपत्र किंवा वास्तव्याचा दाखला असलेले कागदपत्र (आधारकार्ड, वाहनचालक परवाना) असल्यास उत्तम. या पुराव्यांमुळे त्यांची साक्ष घेतली गेल्यास ती रद्दबातल होण्याची शक्यता जवळजवळ नसते.

12. इच्छापत्राचा लाभार्थी व्यवस्थापकाची (Executor) नातेवाईक व्यक्ती साक्षीदार म्हणून टाळाव्या.

13. इच्छापत्राच्या एकापेक्षा जास्त (शक्यतो कमाल 4) प्रती कराव्यात व एकावर Original असे लिहून इतर प्रतींवर Duplicate Copy असे लिहावे. अशी Duplicate copy, कर्त्याने आपल्या लॉकर मध्ये ठेवल्यास हरकत नाही. **मात्र केवळ कर्ता लॉकर उघडू शकत असेल तर ती त्वरित उपलब्ध होणार नाही.** सर्व प्रती कटाक्षाने सीलबंद लिफाफ्यातच पण वेगवेगळ्या जागी ठेवून त्या कुठे ठेवल्या आहेत याविषयी व्यवस्थापकांना कल्पना देऊन ठेवावी. Original इच्छापत्र एका सीलबंद लिफाफ्यात व्यावसायिक/कायदेविषयक सल्लागार कंपनी व्यवस्थापक असल्यास त्यांच्याकडे ठेवावे. ती जर ओळखीतील व्यक्ती असेल तरी अशा रीतीने ठेवावयास हरकत नाही परंतु ते कोणत्याही गैर व्यक्तीच्या हाती लागू न देण्याची काळजी घेण्याविषयी त्या व्यक्तीस सुचवावे. तसेच आपल्या जवळच्या विश्वासू नातेवाईकासही त्याची कल्पना देऊन ठेवावी. थोडक्यात कर्त्याच्या निधनानंतर ते त्वरित आणि सहजी उपलब्ध होणं महत्वाचं! इच्छापत्रातील तरतुदी कोणत्याही लाभार्थीला कळू न देण्याची काळजी घ्यावी.

14. या शेवटच्या दोन्ही सूचना, हल्लीच्या काळाला अनुसरून, कोणावरही अविश्वास म्हणून नव्हे तर केवळ सावधगिरी म्हणून आणि कर्त्याच्या **हिताच्या, सुरक्षेच्या दृष्टीने** केल्या आहेत.

15. इच्छापत्रातील एखाददुसरी तरतूद बदलण्यासाठी Codicil (सुधारणा) करता येते व ते मूळ इच्छापत्राचा भाग म्हणून गणले जाते. त्यासाठी नवीन इच्छापत्र करण्याची गरज नसते.

16. कोणा लाभार्थीचा मृत्यू/ विवाह/ घटस्फोट किंवा नव्या जीवाचे आगमन या/ अशा विविध कारणांनी इच्छापत्रात अनेक बदल जरुरी असतील तर मात्र नवीन इच्छापत्र करण्यावाचून गत्यंतर नाही.

17. केवळ नोंदणीकृत इच्छापत्रच कायदेशीर किंवा ग्राह्य असते असा चुकीचा समज प्रचलित आहे. मात्र प्रमुख लाभार्थी जर एखादी स्वयंसेवी संस्था असेल किंवा बहुतांश हिस्सा केवळ एकाच वारसाच्या नावे केला गेला असेल तर नाराज वारसांकडून इच्छापत्राच्या सत्यतेबद्दल शंका घेतली जाण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे अशा प्रकारची अप्रिय परिस्थिती टाळण्यासाठी नोंदणी करणे आवश्यक ठरते. अशी नोंदणी हा कर्ता इच्छापत्र करतेवेळी संतुलित मानसिक स्थितीत आणि शारीरिकदृष्ट्या सक्षम होता याचा पुरावा देखील ठरू शकतो.

***(क्रमश:)***

## हेरवाडचा आदर्श



‘विधवांच्या सन्मानासाठी ठराव’, हे वृत्त आणि त्यानंतरचे संपादकीय वाचले. आपल्याकडे अनिष्ट प्रथांमुळे विधवा स्त्रियांना सन्मानाने जगता येत नाही. वैधव्य आले तर, पांढऱ्या पायाची किंवा अवलक्षणी म्हणून केली जाते. विधवांनी कुंकू लावायचे नाही. आभूषणे वापरायची नाहीत. गळ्यातील मंगळसूत्र तोडणे, बांगड्या फोडणे, किंवा विधवेने दुसऱ्या महिलेला कुंकू लावायचे नाही. तिची ओटी भरायची नाही. किंवा विधवा स्त्रीला हळदीकुंकवाला बोलावले जात नाही. ही घुसमट किती काळ चालायची? कोल्हापूर जिल्ह्यातील हेरवाड ग्रामसभेने विधवांना सन्मान देण्याचा घेतलेला निर्णय अतिशय योग्य आहे. यामुळे स्त्रियांना समाजात उजळ माथ्याने आणि सन्मानाने जगता येईल. इतरांनीही हेरवाडचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा.

**– गुरुनाथ मराठे (पृ. ४०८)**, *बोरिवली*
*भ्रमणध्वनी : ९९६९३८८४३४*

*संदर्भ दि. ११ मे २०२२ महाराष्ट्र टाइम्स*



• यशवंत मराठे (पृ.३९९), माहिम

# 'काश्मीर फाईल्स' त्या निमित्ताने

भ्रमणध्वनी : ९८२००४४६३०

**का**श्मीर फाईल्स या चित्रपटावर सोशल मीडिया वर पुढील काही प्रतिक्रिया वाचनात आल्या.

१. काश्मीर फाईल्स या चित्रपटाची स्टोरी इथे लिहून, त्याची तीव्रता शब्दांत मांडता येणार नाही. किडा मुंग्यांपेक्षाही वाईट पद्धतीने मारले गेलेले काश्मीरी पंडित मोठ्या पडद्यावर बघताना अंगाचा थरकाप उडतो आणि डोळ्यातून पाणी ओघळतं.

२. काश्मीर खोऱ्यातल्या हिंदूंचे अस्तित्व पुसण्याचा आणि फाईलींमध्ये बंद करून टाकलेला हा रक्तरंजित इतिहास, आज बत्तीस वर्षांनी देशासमोर ठेवला गेलाय. दूर कुठल्या खंडातल्या क्रौर्याबद्दल अरण्यरूदन करणारी माणसं, आपल्याच देशात, शांतपणे, आनंदात जगणाऱ्या आणि अचानक आत्यंतिक क्रौर्य अनुभवत वर्षानुवर्ष निर्वासितपणा लादला गेलेल्या या काश्मीरी पंडितांबद्दल मौन बाळगतात आणि नकळत आपणही त्याच निब्बर सिस्टीमचा हिस्सा आहोत ही अपराधी भावना डोक्यात भुंग्यासारखी भिरभिरतेय.

३. जसं चित्रपटातल्या तरुण काश्मीरी पंडित मुलाचं ब्रेनवॉशिंग या सिस्टिमने केलंय, तसाच चुकीचा इतिहास वामपंथीय विचारधारेने मांडल्याने हे सत्य आपल्याला माहीत नव्हतं. सुदैवाने, आपण आज काश्मिरी पंडितांना उच्चारवात सॉरी म्हणू शकू, कारण आपल्याला आज हे सत्य समजलंय.

४. भारताच्या सेनेचं मनोबल खच्ची करणारी तेव्हाची शासनसंस्था बघून चीड आल्याशिवाय राहत नाही.

जानेवारी १९९० काश्मीर खोऱ्यातला काळाकुट्ट रक्तरंजित कालखंड! दोन दिवसात लाखो काश्मीरी पंडितांनी आपली जन्मभूमी, कर्मभूमी आणि आयुष्य गमावली. ''रालीव, त्सालीव या गालीव'', अर्थात धर्म बदला (इस्लाम स्वीकारा), जागा सोडा (काश्मीरमधून निघून जा) नाहीतर मरा! ही धमकीवजा घोषणा जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रंटने अंमलात आणून काफरांचा, अर्थात काश्मीरी पंडितांचा कत्तलखाना सुरू केला. १९/२० जानेवारी १९९० उगवलेच नसते तर बरं झालं असतं असं वाटावं इतकी नृशंस कत्तल हिंदूंची झाली आणि उर्वरित देशाने ती मूकपणे पाहिली.

याचा विचार करताना काश्मीर मध्ये राजकारणाने कसा धुमाकूळ घातला याचा थोडा इतिहास जाणून घेणे महत्त्वाचे ठरेल. स्वातंत्र्यापासून काश्मीर हे कायम धगधगतच राहिले आहे. १९४७ साली पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी काश्मीरमध्ये सार्वत्रिक जनमत घेऊन त्यांना त्यांचा निर्णय घेऊ दिला जाईल असे आश्वासन दिले ही सगळ्यात मोठी घोडचूक. त्यांनी ते आश्वासन का दिले याचे कारण माहित नाही. परंतु त्यांचे आणि शेख अब्दुल्ला यांचे कायमच विळ्या भोपळ्याचे सख्य. काश्मीर मध्ये लोकशाही कधी नीट रूजलीच नाही; कधी स्थानिक नेत्यांमुळे तर कधी केंद्रिय नेतृत्वामुळे. नेहरूंनंतर इंदिरा गांधी, राजीव गांधी यांनी काश्मीरचा नेहमीच खेळखंडोबा केला. १९८४ साली राजीव गांधी यांनी लोकशाही पद्धतीने निवडून आलेले फारुख अब्दुल्ला यांचे सरकार श्री. जगमोहन यांच्या मदतीने बरखास्त करण्यात आले. पण पुढे गंमत म्हणजे १९८७ साली त्याच राजीव गांधी आणि फारुख अब्दुल्ला यांनी एकत्र येऊन संगनमताने असेंब्ली निवडणूकीत प्रचंड प्रमाणात घोटाळे केले. (election were completely rigged) आणि त्यामुळे काश्मीरी जनतेचा लोकशाहीवरील विश्वासाला पार तडा गेला. पुढे १९८९ साली फारुख अब्दुल्ला यांनी राजकीय काटशह देण्यासाठी तत्कालीन गृह मंत्री मुफ्ती मोहम्मद सईद यांनी पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांच्यावर दबाव आणायला सुरुवात केली की जगमोहन यांना पुन्हा काश्मीरचे राज्यपाल करावे. १९८४ साली घडलेल्या घटनेमुळे जगमोहन यांच्या राज्यपाल पदावरून फारुख अब्दुल्ला खूप आक्रमक होते. त्या दोघांमधील संबंध आज कोशियारी आणि महाराष्ट्र सरकार यांच्यातील संबंधांपेक्षा खूपच खराब होते. अखेरीस जानेवारी १९९० मध्ये जगमोहन यांना राज्यपाल करण्यात आले आणि फारुख अब्दुल्ला यांनी ताबडतोब राजीनामा दिला आणि लगेचच जगमोहन यांनी विधानसभा बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लागू केली.

त्यामुळे जेव्हा काश्मीरी पंडितांना हाकलून लावायला सुरुवात झाली तेव्हा काश्मीरमध्ये कोणाचेच सरकार नव्हते. तिथे राष्ट्रपती राजवट होती आणि जगमोहन, जे एक प्रकारे आजच्या भाजपच्या भूमिकेशी सहमती असणारे होते, ते काश्मीरचे राज्यपाल होते. आता प्रश्न असा येतो की जगमोहन यांनी मुद्दाम

(?) निष्क्रीयतेची भूमिका घेतल्यामुळे पंडितांना पलायन करायला भाग पाडले असावे का? की जगमोहन यांनी प्रयत्न केले पण भारतीय सरकारने काही केले नाही? मग पुढचा प्रश्न की केंद्रात सरकार कोणाचे होते?

ज्यावेळी काश्मीर पंडितांचे कांड झाले त्यावेळी व्ही.पी. सिंग पंतप्रधान होते आणि भाजपा हा केंद्र सरकारातील महत्त्वाचा आणि मोठा घटक होता. जर एवढ्या मोठ्या प्रमाणात हिंदूंचे शिरकाण होत होते तर मग भाजपने सरकारचा पाठींबा का काढला नाही? परंतु त्याच भाजपाने पुढच्या नऊ महिन्यात मंडल कमिशनच्या मुद्यावरून सरकारचा पाठींबा काढून घेतला.

पुढील दोन ते तीन वर्षात धार्मिक ध्रुवीकरण होत गेले आणि तुष्टीकरणाच्या राजकारणाचा भाजपाला फायदा मिळत गेला. त्यातच काँग्रेस बोफोर्स प्रकरणात अडकली आणि १९९१ साली त्यांची ४१४ जागांवरून १९७ वर घसरण झाली. काँग्रेसच्या २१३ जागा घटल्या तर जनता दलाच्या १२९ जागा वाढल्या आणि भाजपा पहिल्यांदाच शंभरी पार करून १२० वर पोहचला. पुढे १९९८ आणि तसेच १९९९च्या अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारात तेच जगमोहन आधी कम्युनिकेशन, मग अर्बन डेव्हलपमेंट आणि नंतर ट्यूरिझम मंत्री झाले.

दोन वर्षांपूर्वी भारत सरकारने ३७० कलम रद्द करून काश्मीरचा स्पेशल दर्जा काढून घेतला. पण आता जर काश्मीरचे भारताच्या राजकीय प्रवाहात assimilation आणि integration व्हायला हवे असेल तर सरकारला अनेक ठोस पावले उचलावी लागतील ज्यायोगे काश्मीरी जनतेचा विश्वास परत re-establish होईल. पण हो, मी फक्त आशाच करू शकतो, नाही का?

आज जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, शेख अब्दुल्ला, राजीव गांधी, व्ही.पी. सिंग, मुफ्ती मोहम्मद सईद, अटल बिहारी वाजपेयी, जगमोहन हे हयात नाहीत. पण लालकृष्ण अडवाणी आणि फारूख अब्दुला जिवंत आहेत. निदान त्या दोघांनी तरी १९९० साली काश्मीर पंडित घटनेत नेमके काय झाले ह्यावर देशाला सत्य सांगितले पाहिजे.

मला पूर्ण कल्पना आहे की काश्मीरी पंडितांचे शिरकाण कुठच्याच युक्तिवादाने वैध ठरू शकत नाही. तो या देशाला लागलेला एक काळाकुट्ट डाग आहे. जो कधीही पुसला जाऊ शकणार नाही. काश्मीर खोऱ्यातल्या हिंदूंचे अस्तित्व पुसण्याचा हा रक्तरंजित इतिहास, आज बत्तीस वर्षांनी देशासमोर ठेवला गेलाय ही गोष्ट नक्कीच चांगली आहे. परंतु आजपर्यंत आपल्या देशात गलिच्छ राजकारणाने अनेक गोष्टींचा विचका केला आहे ही गोष्ट देखील लक्षात ठेवली पाहिजे.

yeshwant.marathe@gmail.com

---

# प्रसन्न व्यक्तिमत्त्व

**आ**युष्याच्या विविध टप्प्यांवर आपल्याला गुरू, मित्र आणि मार्गदर्शक भेटतात. बालवयात आपले आई-वडील, शाळा कॉलेजमध्ये शिक्षक आणि समाजात वावरताना वडीलधारी माणसं हेच आपले मित्र, गुरु व मार्गदर्शक असतात. मलाही माझ्या आयुष्यात चांगले शिक्षक आणि मार्गदर्शक भेटले. त्यांचं नाव मधुसूदन गोखले. त्यांची आणि माझी जुनी ओळख. केळये, रत्नागिरी हे त्यांचं जन्मस्थान. ते माझ्या आजीचंही (आईची आई) गाव होतं. त्यामुळे लहानपणापासूनच त्यांची आणि माझी ओळख होती. त्यांनी मला रहाटावर बसून पाणी कसं काढायचं हे शिकवलं. माझं लग्नसुद्धा त्यांनीच जमवलं.

मधुसूदन गोखले यांनी आयुष्यातील मैदानात शतक पूर्ण केलं. या शतकापाठी त्यांची दुर्दम्य इच्छाशक्ती, थोरा-मोठ्यांचे आशीर्वाद आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे परमेश्वराचा कृपा प्रसाद कारणीभूत आहे. अशा या शतकमहोत्सवी आनंद सोहळ्याचा मी साक्षीदार होतो. हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना आठवीपर्यंतचंच शिक्षण घेता आलं. त्यांनी रेल्वेमध्ये २९ वर्षे नोकरी केली. त्यांचं प्रसन्न व्यक्तिमत्त्व, हसरा चेहरा, कपाळावर कधीही न पडणारी आठी आणि सदैव दुसऱ्यांना मदत करणं या वैशिष्ट्यांमुळे त्यांनी अनेक माणसं जोडली. आपल्या कारकिर्दीत अनेकांना आर्थिक मदत केली. घरचं काम असो वा शेतीचं काम असो, ते त्यांनी आनंदाने केलं. मधुसूदन गोखले म्हणजे उत्साहाचा झराच जणू! २०१७ साली आमच्याबरोबर हैदराबादला सहलीसाठी आले होते. त्यात ते प्रत्येक गोष्टीत आघाडीवर होते.

अलीकडची गोष्ट सांगायची झाली तर, २०२१ साली केळये येथे लक्ष्मीकांत मंदिरात काकड आरती (कार्तिक पौर्णिमा) उत्सव साजरा झाला. त्या ठिकाणी ते पालखीबरोबर नाचले. वयाच्या ९९व्या वर्षी त्यांचा तरुणांना लाजवेल असा उत्साह पाहून सर्वजण थक्क झाले. शतक महोत्सवी सोहळ्याला त्यांना प्रकर्षाने दोन व्यक्तींची उणीव भासली. एक म्हणजे त्यांची पत्नी सुशीला गोखले आणि त्यांची लाडकी सून रश्मी गोखले. 'माझी दोन्ही मुलं, सुन मेधा, नातवंडं आणि पतवंडं हे सर्व माझी आस्थेने विचारपूस करतात आणि काळजी घेतात. हीच माझ्या जन्मभराच्या कमाईची पुंजी आहे', असं ते म्हणतात.

**– गुरुनाथ मराठे (पृ.४०८)**, *बोरिवली*

*भ्रमणध्वनी:* ९९६९३८८४३४

# वाचकांचा पत्रव्यवहार

श्री. हेमंत यास,
सौ. नीलांबरीचा सप्रेम शुभ आशिर्वाद

मुद्दाम पत्र लिहीण्यास कारण की गेली अनेक वर्ष 'हितगुज'चे छापील अंक नियमितपणे वाचायची सवय झाली होती. पण अचानक ओढवलेल्या करोनाच्या संकटामुळे सर्व कामे ठप्प झाली होती. त्यात छपाईचे कामही बंद होते. त्यामुळे 'हितगुज'चा छापील अंक काढणे सर्वस्वी अशक्य होते. पण 'हितगुज' हे तर मराठे कुलबांधवांचे महत्त्वाचे संपर्क माध्यम आहे. आता संपर्क कसा होणार या विवंचनेत अडकून न पडता सध्या मराठे प्रतिष्ठानचे झोकून देऊन काम करणारे शिलेदार हेमंत, श्रीनिवास व विजय यांनी माघार न घेता करोनाच्या संकट काळातही अनेक अडचणींवर मात करून व नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून ई स्वरूपात 'हितगुज'चे अंक नियमित प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. पण अनेक वृद्ध लोकांना हे नवीन तंत्रज्ञान अवगत नसल्यामुळे 'हितगुज'चे अंक वाचता आले नाहीत जरी कोणाच्या मदतीने अंक वाचला तरी छापील अंक वाचून जे समाधान मिळत होते ते ई अंकाने मिळाले नाही अशी अनेकांची तक्रार होती. त्या तक्रारदारांमध्ये मी ही आहेच.

मला मनापासून पटते की जगाबरोबर जायचे असेल तर ई स्वरूपातील अंक स्वीकारला पाहिजे पण म्हणतात ना की 'कळते पण वळत नाही' अशी आमची स्थिती आहे. नवीन तंत्रज्ञानाचे महत्त्व पटतंय पण काही शारीरिक मर्यादांमुळे ते कृतीत येऊ शकत नाही. हे वास्तव आहे.

पण काही दिवसांपूर्वी दीर्घ कालावधीनंतर झेरॉक्स केलेला 'हितगुज'चा १२९ वा अंक (मार्च २०२२) मला अध्यक्ष विजय मराठे यांनी प्रत्यक्ष घरी आणून दिला. अंक पाहून आनंद गगनात मावेना. अधाशासारखा जसा जमेल तसा अंकातला शब्द न् शब्द वाचून काढला. यावेळच्या या छापील स्वरूपातील अंक वाचल्यामुळे खूपच मानसिक समाधान मिळाले यासाठी विजयला मनापासून धन्यवाद देते.

या अंकात संपादकीय पासून सर्वच लिखाण खूप वाचनीय आहे. इतिहास, विज्ञान, कला, भाषा, स्वानुभव, चिंतन, पुणे व गोव्याचे वृत्तलेखन अशा विविध विषयांवरचे लेखन असल्यामुळे अंक खूपच आवडला.

मला विशेष भावलेला लेख म्हणजे सौरभने लिहीलेली महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांची माहिती. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे मी ओंकारेश्वराच्या अगदी जवळ राहते. तेथे पटवर्धन यांची समाधी आहे एवढेच माहित होते. त्यांच्या बद्दलची महत्त्वपूर्ण माहिती या लेखातून मिळाली आणि माझ्या ज्ञानात भरच पडली. ह्यामुळे सौरभचे विशेष कौतुक.

या 'हितगुज'च्या अंकातील सर्वच लेखकांना त्यांच्या लेखनासाठी माझा सलाम. असेच वैविध्यपूर्ण लेख यापुढील अंकातही वाचायला मिळतील याची खात्री आहे. आपल्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

'हितगुज'च्या यापुढील सर्व अंकांमध्ये ज्ञान, माहिती व मनोरंजनावर आधारीत भरपूर लेख वाचायला मिळावेत ही अपेक्षा आपण नक्कीच पूर्ण कराल त्यासाठी माझ्या सदिच्छा.

**– सौ. नीलांबरी रमेश मराठे, (पृ.२८०),** *पुणे*
*भ्रमणध्वनी : ९४०४२४१७६१*

---

## विचार – तुका म्हणे...

(२)

*आम्हा हे कौतुक जगा द्यावी नीत। करावे फजित चुकती ते।।*
*कासयाचा बाध एकाच्या निरोपे। काय व्हावे कोपे जगाचिया।।धृ.।।*
*अविद्येचा येथे कोठे परिश्रम। रामकृष्णनाम ऐसे बाण।।*
*तुका म्हणे येथे खऱ्याचा विकरा। न सरती येरा खोट्यापरी।।*

(८३४)

तुकोबांनी आपले कार्य हे ईश्वरदत्त आहे, असे मानले होते. आपण ईश्वराचे निरोपे – प्रेषित आहोत; त्यामुळे लोकांच्या रागाची आपल्याला पर्वा नाही. जगाला नीतीची शिकवण द्यावी आणि जे त्या शिकवणीप्रमाणे वागायला चुकतात, त्यांना फजित करून सोडावे, हे काम आम्ही कौतुकाने करतो, असे ते सांगतात. तुकोबांच्या काळात मायावादाचे, अविद्येचे बरेच स्तोम माजले होते. त्याबाबतची आपली भूमिका स्पष्ट करताना ते सांगतात की, रामकृष्णांच्या नामासारखे बाण आमच्या हाती असल्याने अविद्येनाशासाठी वेगळे श्रम करायची आम्हाला गरजच नाही. खोट्यालाच खरे म्हणवून खपविणाऱ्यांना शेवटी ते इशारा देतात की, आम्ही खऱ्याचे व्यापारी आहोत. आमच्यापुढे खोटे चालणार नाही. जगाचा माया म्हणून त्याग न करता उचित असे लौकिक व्यवहार जणू क्रीडा म्हणून पार पाडायची तुकोबांची ही भूमिका आहे.

# कस्तुरीमृग

• श्री. नारायण जनार्दन जाईल (पृ. ७५५), ठाणे

'आपटे, बारा तारीख ठरली ना!'

प्रधानच्या बोलण्याचा संदर्भ चटकन त्याच्या लक्षात आला नाही म्हणून प्रकाशने उलट विचारलं,

'कशाबद्दल म्हणतोस'

'छान सकाळीच ठरलं ना की या बारा तारखेला तुझ्याकडे जमायचं.'

'पण......'

'पण काय?'

'अरे पटेल गावाला गेलाय ना... तो केव्हा येणार हे ठाऊक नाही म्हणून' त्याचं बोलणं पूर्ण होण्यापूर्वीच प्रधानाने खुलासा केला.

'अरे तो सोमवारी येणार आहे. मघाशीच मला मोटवानी म्हणाला... तो बघ मोटवानी येतोय इकडे.'

तेवढ्यात मोटवानी आला आणि म्हणाला, 'क्यों प्रकाश, क्या चल रहा है.'

'कुछ नही.'

'बारा तारीख का पक्का हे ना.'

'पर पटेल तो.'

'सोमवार को जा रहा है. मैने कल रात को ही मोबाईल पर बात की उसके साथ.'

'पाहिलंस प्रकाश, आता पक्क झांल ना.'

'हं'

'यार प्रकाश, पटेल भी पुछ रहा था... बारा तारीख हम लोग प्रकाश के यहाँ मिल रहे है.' असं म्हणून मोटवानी निघून गेला.

'बारा तारीख म्हणजे हा रविवार जावून पुढचा रविवार'

'बरोबर'

प्रकाश गप्प बसल्यावर प्रधानने विचारलं.

'कां रे, काही अडचण'

'तसं नाही.'

'आता तर तुझा मोठा ब्लॉक आहे. त्यामुळे कुठलीच अडचण नाही आणि मुख्य म्हणजे कार्यक्रम तुझ्या घरीच होणार... हॉटेलमध्ये नाही. गेल्या वेळी अचानक हॉटेलवर अरेंज केलंस.'

'त्यावेळी अचानक अनपेक्षित.'

'या वेळी काही प्रॉब्लेम नाही ना!'

'नाही रे!'

'मग ठरलं तर... तुला सांगायचं राहिलंच की... अरे परवा समीर सावंतचा फोन आला होता... बराच वेळ बोलत होता. सगळ्यांची चौकशी करीत होता. बोलण्याच्या ओघात मी त्याला सांगितलं की बारा तारखेला आम्ही जमणार आहोत. गंमत म्हणजे तो कदाचित त्या सुमारास येणार आहे. तसं झालं तर तोही येणार आहे त्या दिवशी. म्हणाला किती दिवस झाले भेटलो नाही. सगळ्यांना काठमांडूला बोलावलंय त्याने. चांगले आठ दहा दिवस या म्हणाला.'

'त्याचं कसं चाललंय.'

'मस्त मजेत आहे म्हणाला. जुन्या आठवणींची उजळणी करण्यात वेळ घालवतो.'

'बराय... मी निघतो.'

'बारा तारखेचं नक्की'

'थोडं पुढे ढकललं असतं तर...'

'नको रे, मग ख्रिसमसची गडबड... आता बदल नको आणि घरीच, हॉटेल नाही.'

'हं'

मदन प्रधानचा निरोप घेवून प्रकाश बाहेर पडला. मनामधे झालेलं बोलणं रेंगाळलं.

कुणाची ओळख होणं, ती टिकणं आणि त्यातून संबंध निर्माण होणं या गोष्टी योगायोगानंच घडतात यावर शेवटी विश्वास बसतोच. नाहीतर एखाद्या अगदी जवळच्या नातेवाईकाच तोंड आपण प्रत्येक महिन्यांत पहात नाही. परंतु त्याच वेळी एकदा दूर असणाऱ्या परिचिताची आवर्जुन भेट घेतो. मनाची जवळीक असायला हवी. केवळ जवळचा नातेवाईक आहे म्हणून त्याच्याबद्दल प्रेम किंवा आपुलकी वाटेलच असं नाही. कुणी शाळेत बरोबर होते म्हणून तर कुणी सहलीला आले होते म्हणून... कारण कोणतेही असो, पण मनं जुळल्यावर मैत्री चटकन जमते. कुणाशीही ठरवून मैत्री करता येत नाही. अशा मैत्रीतूनच ग्रुप तयार होतो. प्रकाश आपटेचा असाच एक ग्रुप तयार झाला होता. मदन प्रधान, समीर सावंत, पटेल, किशोर लेले, आनंदराव, राजा मोटवानी या मंडळींशी कारणा कारणाने परिचय झाला. काही म्हणायला मदन प्रधान आणि किशोर लेले हे दोघे प्रकाशचे

शाळा सोबती. बाकीच्या मंडळींची ओळख नंतरची पण स्वभाव जुळले. कुंडल्या जमल्या. गाठी भेटी वाढत गेल्या. सुरुवातीला पुरुष मंडळींच्या बैठका दोन तीन महिन्यांनी जमत असत. गप्पा टप्पा. वेळ मजेत जायचा मग एक दिवस मोटवानी म्हणाला,

'यार प्रकाश, ये ठीक नही.'

'क्या ठीक नही.'

'देखो, हम लोग मिलते है, मौज करते है मगर हमारे घरवालों ने क्या पाप किया है... उनको भी बुलाना चाहिये... मदन तुम्हारी क्या राय है.'

मदन प्रधानला पटलं. त्यानं मान डोलावली आणि सहमती दर्शवित म्हणाला, 'बिलकुल ठीक कहा तुमने. प्रकाश मोटवानी म्हणतो ते बरोबर' आहे. आपल्या फॅमिलीज आल्या तर मजा येईल.

'अरे पण सगळी जमवाजमव करायची म्हणजे... शिवाय सगळ्यांना तो दिवस सोयीचा असला पाहिजे.'

'प्रकाश झाली का तुझी सुरुवात. अरे, अडचणी येणारच. कदाचित सहा महिन्यांनी एकदा जमता येईल. पण सर्वांनीच जमलं म्हणजे काय...'

मदनने त्याचं बोलणं खोडून काढलं. राजाला मराठी चांगलं कळत होतं. तो लगेच म्हणाला.

'ये हुई ना बात... तो ये फायनल हुआ और पहला गेट टु गेदर मेरे घर में लोखंडवाला में होगा ठीक है.'

'घरमें मिलेंगे... या हॉटेल में अँरेंज करते है.'

'प्रकाश होटल में तो जाते ही है. अगर घर पर मिलेंगे तो फॅमिली का परिचय होगा... क्यो मदन.'

'बिलकुल ठीक है. प्रकाश एखाद्याकडे काही अडचण असली किंवा अनपेक्षित निर्माण झाली तर अशा वेळी हॉटेलांत जाता येईल. पण तिथे आपल्याला मोकळेपणाने बोलता येणार नाही. तेव्हा आपण घरीच जमायला हवं.'

राज मोटवानीची कल्पना सगळ्यांनीच उचलून धरली. रोजच्या साचेबंद आणि घड्याळाला बांधलेल्या दैनंदिन जीवनांतून केव्हातरी काही वेळ बाहेर पडावं आणि नेहमीचे ताणतणाव विसरावे असं प्रत्येकालाच वाटत असतं. ठरल्याप्रमाणे मित्रमंडळी ह्या रविवारी मोटवानीकडे जमली. त्याने मोठा प्रोग्रॅम आखला होता. मोटवानीची आर्थिक परिस्थिती चांगलीच होती. त्यामुळे कसलीच कमतरता नव्हती. अर्थात त्यात स्वतःच्या अर्थिक परिस्थितीचं प्रदर्शन करण्याचा हेतू नव्हता. त्याचा स्वभावच तसा होता. पार्टी छान झाली. सर्वांनीच आनंद लुटला. संध्याकाळी सर्व मंडळी निघाली तेव्हा दीपक पटेल म्हणाला,

'मोटवानी बहुत मजा आया आज, सच बोलू तो जाने का मन ना करता है.'

'तो रुक जा. रातका खाना खाकर जाना. नही तो सब लोक आज रुक जाना..., सुबह उठके चले जाना' मोटवानी मोकळेपणाने बोलला.

'नही नही राज, अभी तो घर जायेंगे... कल फिर ऑफिस जाना ही है. लेकीन बहुत बहुत धन्यवाद...'

'धन्यवाद किसलिये अभी एक दिन तुम्हारी भी टर्म आनेवाली है पटेल.' मोटवानी त्याच्या पत्नीकडे पाहून म्हणाला, 'क्यों भाभीजी ठीक कहा ना मैने. हमे आपका निमंत्रण भी नही चाहिये.'

हर्षा पटेल हसून म्हणाली, 'हां हां जरुर आईये... घरका मामला है. बुलाने की जरुरत नही. अगले संडे आवो कांदिवली ठीक है.'

त्यावर सगळेच हसले. एका वेगळ्या वातावरणात सर्वजण होते. वाटलेलं समाधान प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर तरळलं होतं.

दिवसभर गप्पा चालू होत्या. प्रत्येकजण एकदा तरी म्हणाला असेल... आपण हा कार्यक्रम यापूर्वीच कां आखला नाही! पण म्हणतात ना की प्रत्येक गोष्टीसाठी योग्य वेळ यावी लागते. सर्वजण एकमेकांचा निरोप घेवून बाहेर पडले.

प्रकाश आणि वंदना बाहेर पडले. त्यांचा मार्ग वेगळा होता. त्यांना ठाण्याला जायचं होतं. ट्रेन किंवा बस. ट्रेनला गर्दी असणार म्हणून त्याने बस स्टॉपचा रस्ता धरला. ठाण्याहून नवी ए.सी. बस सेवा सुरू झाली होती. प्रकाशचा सगळ्यांचा परिचय होता. परंतु वंदना पहिल्यांदाच त्याच्या बरोबर आली होती. एकटेच जाण्याचा त्याचा विचार होता. किंबहुना त्याने आडवळणाने तसं सुचवलंही होतं. परंतु ते बरं दिसणार नाही असं तिला वाटलं कारण पूर्वी अनेकदा तो एकटाच गेला होता आणि बायकोची प्रकृती बरी नाही असं कारण सांगितलं होतं. दुसऱ्या दिवशी मदन प्रधानच्या बायकोचा वंदनाला फोन आला.

'वंदनाताई कशी आहे तब्येत आता.'

वंदनाला क्षणभर त्या बोलण्याचा उलगडाच झाला नाही. परंतु क्षणार्धात तिला कल्पना आली. दुसऱ्याच क्षणी स्वतःला सावरत म्हणाली,

'अहो, जबरदस्त सर्दी झाली आहे. आज बरं आहे जरा काल नाकातून नदी वाहत होती.'

'हो कां...'

'आणि चार लोकांत सारखं सुरुक सुरुक करणं बरं दिसत नाही म्हणून बेत रद्द केला... हे म्हणत होते की चल, घरचीच मंडळी आहेत पण...'

'एका दृष्टीने तुमचं बरोबर होत, आपण पुनः भेटूच.'

'कसा झाला कार्यक्रम.'

'छान झाला.'

‘यावेळी तुमच्या पाककृतींचा आस्वाद घेता आला नाही. तुमचे पदार्थ फार टेस्टी असतात. शोभाताई पुढच्या वेळी व्याजासहित वसूल करीन.

शोभा प्रसन्नपणे हसली.

बस स्टॉप पर्यत प्रकाश आणि वंदना चार दोन वाक्यच बोलले असतील. बस सुरू झाल्यावर तिच्या मनांत विचारचक्र सुरू झालं. वंदना लग्न झाल्यापासून गेली पंधरा वर्षे प्रकाशला पहात होती. दापोली सारख्या छोट्या आणि काहीशा मागास गावात दूर असल्यामुळे आधुनिक सुविधांचा विशेष परिचय नाही त्यामुळे सुरुवातीला थोडसं बुजायला होत असे. सुट्टीत पुण्यामुंबईला नातलगाकडे गेल्यावर मनांत न्यूनगंड निर्माण होत असे. परंतु वंदना डगमगली नाही. तिचा अभ्यास उत्तम होता. शाळेत तिनं पहिला नंबर चुकवला नाही. एस.एस.सी.ला शाळेत पहिली आली होती. त्यामुळे बाहेरून अभ्यास करून बी.ए.ची परीक्षा देणं शक्य झालं. त्यातही चांगलं यश मिळालं. दहाजणींत उठून दिसणारी त्यामुळे चटकन लग्न जमलं. प्रकाशने पाहिलेली ती पहिलीच मुलगी आणि योगायोग म्हणजे वंदनासाठीही पाहिलेलं हे पहिलंच स्थळ. शेवटी या गोष्टी योगायोगानेच घडतात. स्थळ सुचविणाऱ्या गृहस्थांनी मुलगा इंजिनियर आहे म्हणून सांगितल्यावर ती मनोमन सुखावली होती. पण नंतर कळलं की तो पदवीधर इंजिनियर नाही त्याने पुण्याच्या कॉलेजमधून तीन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. थोडसं खटकलं. पण तिने फार विचार केला नाही. एका शुभ मुहूर्तावर नव्या घरांत प्रवेश केला. आपल्या संसाराशी एकरुप झाली. घरांत वडिलधारं कुणीच नव्हतं. प्रकाश तसा पोरकाच होता. वाढला तो चुलत्याकडे. थोडीफार सामाईक इस्टेट होती. त्याने विचार केला की आपण शक्य तेवढ्या लवकर स्वावलंबी झालं पाहिजे. तसा अभ्यासात तो हुषार होता. त्यामुळे बी.ई.चा अभ्यासक्रम त्याला झेपला असता. परंतु प्रश्न पैशाचा होता. या पार्श्वभूमीवर त्याने सारासार विचार करून डिप्लोमाचा मार्ग पत्करला. चांगल्या मार्कांने उत्तीर्ण झाला आणि नोकरीही मिळाली.

लग्न झाले त्यावेळी तो रत्नागिरीला होता. तिथे शांत जीवनक्रम चालला होता. परंतु त्या नोकरीत विशेष प्रगती होण्याची शक्यता नव्हती. वंदनाला त्याचा स्वभाव आवडला होता. लग्न झाल्यावर त्याला वंदनाचा आधार वाटू लागला. पण काही महिन्यातच त्याला वाटणारा न्यूनगंड तिच्या लक्षात आला. तिला वाटणाऱ्या न्यूनगंडाशी तिने युद्ध केलं होतं. आत्मविश्वास मिळवला होता. त्यामुळे प्रकाशला सुद्धा त्या मनोवृत्तीतून बाहेर काढणं गरजेचं होतं. तिला ते अनिवार्य वाटलं. तिने फार कारणमीमांसा केला नाही. चुलत्यांच्या घरी तो एका दृष्टीने आश्रिताचं जीवन जगला. परंतु मुख्य कारण निराळं होतं. आपण पदवीधर इंजिनियर नाही हे शल्य त्याला कायम अस्वस्थ करीत असे. त्यामुळे घरची जागा कधीही मिळणार नाही अशी त्याची धारणा बनली होती. त्याच्या अंगी क्षमता आहे हे तिच्या लक्षात आलं होतं. तिने एका क्षणी निर्णय घेतला की प्रकाशला न्यूनगंडाच्या चक्रव्यूहातून बाहेर काढायचं. पहिली गोष्ट म्हणजे रत्नागिरी सोडायची आणि मुंबईच्या दिशेने पुढे सरकायचं. तिने स्वतःच वृत्तपत्र पाहायला सुरुवात केली. जाहिराती वाचत होती आणि एक दिवस ती म्हणाली,

‘आजच्या पेपरमध्ये एक चांगली जाहिरात आली आहे. तुमच्यासाठी एकदम फिट आहे.’

‘कुठली?’

‘ही बघा.’

प्रकाशने जाहिरात पाहिली. सकृतदर्शनी त्याला योग्य वाटली पण पुन्हा न्यनूगंड...

‘पण वंदना, अगं या ठिकाणी पुण्या मुंबईचे अनेक उमेदवार असणार त्यामुळं...

‘असं कां म्हणता तुम्ही. तुमचा अनुभव त्यांना हवा असणार आहे.’

‘जागा फक्त चार आहेत.’

‘हो पण त्यातली एक जागा तुमच्याकरीता रिझर्व आहे असं समजा. असा नकारात्मक विचार का करता.’

‘का कोण जाणे.’

‘मला खात्री आहे की तुमची निवड होईल. उद्या चतुर्थी आहे. अर्ज उद्याच रवाना करा... बस ठरलं.’

असं म्हणून तिने तो विषय संपवला. दुसऱ्याच दिवशी ठरल्याप्रमाणे अर्ज पाठवला. काही दिवसांनी त्याला मुलाखतीचं पत्र मिळालं आणि विशेष म्हणजे ती नोकरी त्याला मिळाली. आत्मविश्वास वाढला. रत्नागिरी सुटली आणि प्रथम कर्जत आणि नंतर ठाणे असं स्थलांतर झालं. त्याच काळांत वंदनाने त्याला ए.एम.आय.ई.च्या परीक्षेला बसायला प्रवृत्त केलं. तो उत्तीर्ण झाला. त्याला पदवी समकक्ष मान्यता असण्यामुळे बढती मिळाली. नंतर अपेक्षितपणे एका मोठ्या कंपनीत चांगल्या पगाराची नोकरी मिळालीच परंतु वर्षा नंतर सहा महिन्यासाठी जर्मनीला जाण्याची संधी मिळाली. आर्थिक प्रगती झालीच परंतु संसार वेलीवर पूजा आणि सागर अशी दोन फुलं फुलली. ठाण्याला प्रथम दोन खोल्यांची जागा होती नंतर स्वतंत्र ब्लॉक आणि गाडी. दोन वर्षांपूर्वी घोडबंदर रोडवरील एका कॉम्प्लेक्स मध्ये तीन बेडरुमची ऐसपैस जागा घेतली. स्विमींग पूल, क्लब हाऊस या साऱ्या सुविधा होत्या. त्याच काळात जुने मित्र भेटले. एक छान ग्रुप जमला आणि आता गेट टुगेदर साखळी सुरू झाली होती. पण राज मोटवानीकडचा कार्यक्रम झाला आणि त्यानंतर

लागोपाठ निरोप समारंभ झाले. आनंदराव अमेरिकेत गेला. सतीश खन्नाने कॅनडाचा रस्ता धरला आणि अगदी अनपेक्षितपणे समीर सावंतने काठमांडूसाठी प्रयाण केलं.

पण तो कार्यक्रम सुरुच राहिला. प्रधान, मोटवानी आणि पटेल हे तिघेही पदवीधर इंजिनीयर होते. शिवाय कौटुंबिक परिस्थिती उत्तम असल्यामुळे वारस म्हणून प्रत्येकाला घरांतून पुष्कळ पैसा मिळाला होता. त्यांचं राहणीमान त्या स्तरावरचं होतं. प्रकाश स्वयंभू होता. अर्थात काळाच्या ओघात त्याचीही चांगली प्रगती झाली होती. वंदनाच्या आग्रहामुळे त्याने व्यवस्थापन क्षेत्रातील दोन अभ्यासक्रम पूर्ण केले होते. कंपनीने त्याची दखलही घेतली होती. तथापि त्याच्या मनांत न्यूनगंड रेंगाळला होताच.

पहिली पार्टी मोटवानीकडे झाली. नंतर जमले होते दिपक पटेलकडे. नंतर मदन प्रधान त्याचा तर खारला बंगला होता. प्रकाशला सारखं वाटायचं की खार, लोखंडवाला आणि बांद्रा या मानाने आपली जागा म्हणजे काहीच नाही. तीन रुमचा ब्लॉक, वंदना म्हणाली होती की सगळं काही व्यवस्थित होईल. परंतु सोसायटीत पेस्ट कंट्रोलचे लोक येणार असल्याचं कारण सांगून त्याने जेवण हॉटेलात आयोजित केलं. त्यावेळी मोटवानी म्हणाला,

'आपटे, ये ठीक नही हुआ यार घर में जैसे गप्पे लगाते वैसा माहोल होटल में नही होता है.'

'सही हा मगर...'

'अभी तो तुमने बडा ब्लॉक बुक किया है?'

'हां'

'कब मिलेगा!'

'पाच छे महिने में पक्का मिलेगा.'

'मग प्रकाश पुढच्या वेळी तुझ्या नव्या ब्लॉक मध्येच जमायचं. किती कारपेट एरिया आहे.'

प्रधानने चौकशी केली.

'तीन बेडरूम'

'मग प्रश्नच नाही... क्यों मोटवानी.'

'ये क्या पुछनेकी बात है... प्रकाश अभीसे तय्यारी करो.'

त्यावर सगळेच हसले.

कार्यक्रम चालू होते आणि आता प्रकाशकडे जमायचं ठरलं होतं. तारीख ठरली... बारा डिसेंबर, प्रकाश पुनः गडबडला. गोंधळला. पुन्हा न्यूनगंडाने उसळी मारली. मनांत असंख्य शंका, जमेल कां? नीट पार पडेल का? वंदना कसं करील. तिला सवय नाही. या सर्वांच्या बायका शहरांत वाढलेल्या. कॉन्व्हेंट शाळांमधून बाहेर पडलेल्या. त्याला काही सुचेना.

प्रकाशने गाडी पार्क केली आणि तो तिथेच उभा राहिला. वंदनाला काय सांगायचं. ऑफिसातून बाहेर पडताना मोटवानीने बजावलं होतं. कार्यक्रम घरीच झाला पाहिजे. हॉटेलात नाही. जेमतेम दहा दिवसांचा अवधी होता. तेवढ्यांत त्याच्या कानावर शब्द पडले,

'क्यों आपटे सब कुछ भूल गये क्या?'

प्रथम प्रकाशच्या मेंदूने नोंद घेतली नाही. त्याने मागे वळून पाहिले, समोर 'बी' टॉवर मध्ये कोहली दिसले.

'क्या हुआ'

प्रकाशने विचारलं. खरं म्हणजे त्याचं लक्ष नव्हतं. आपल्या विचारात तो पूर्णतया बुडून गेला होता. त्याची मनस्थिती बहुदा कोहलीच्या लक्षात आली असावी म्हणून त्याने विचारलं.

'कहाँ खो गये.'

प्रकाश फक्त हसला आणि गाडी बंद केल्याची खात्री करून तो आपल्या टॉवरच्या दिशेने निघाला. मनात अस्वस्थता होती. वास्तविक समस्या अशी काहीच नव्हती. परंतु शेवटी स्वभावाला औषध नव्हतं हेच खरं. सतत काळजी करणं हा प्रकाशसारख्या मंडळीचा स्थायीभाव असतो. यांची विचारसरणी नेहमीच विरुद्ध दिशेला वळते. कुठलंही काम करताना प्रथम अडचणींचाच विचार होतो. आणि त्याच्या जोडीला कितीही दूर सारण्याचा प्रयत्न केला तरी संगत न सोडणारा न्यूनगंड. बेल वाजवताच दरवाजा उघडला... समोर वंदना उभी होती. हसतमुख तिला केव्हाही पाहिलं तरी ती ताजीतवानी दिसायची. त्याच्या आयुष्यात तो मोठा आधार होता. मनांतल्या मनांत एका गोष्टीची प्रकाशला कबूली द्यावी लागे. वंदनाचा हसरा आणि समाधानी चेहेरा पाहिला म्हणजे सर्व काळज्या आणि समस्या दूर पळत असत. त्यामुळे त्याला सुरक्षित वाटायचं. यावेळीही तसंच झालं. वंदनाने प्रकाशच्या हातातील बॅग घेतली आणि त्याला विचारलं.

'आज उशीर झाला.'

'अगं वाटेत जरा वेळ गेला.'

'तुम्ही फ्रेश होताय तोपर्यंत चहा करते.'

'चहा नको, कॉफी कर'

'बरं'

'तुही घेशील ना'

'घेईन अर्धा कप'

'मुलं आली नाही अजून'

'सोसायटी डे आहे ना. त्यासाठी स्पोर्टस अॅरेंज केलेत. तिकडे गेलेत.'

'यांनी भाग घेतलाय की काय?'

'पूजानं टेबल टेनिस मधे पहिला राऊंड तिने जिंकला सुद्धा... चांगलं खेळते.'

'अरे वा...'

'पुढच्या महिन्यात दहा तारखेला मुख्य कार्यक्रम आहे.'

'तुम्हाला माहित नव्हतं.'

'तुम्ही या तर सांगते सर्व कार्यक्रम.'

प्रकाश बाथरुमकडे गेला आणि वंदना कॉफी करण्यासाठी स्वयंपाकघरात. कॉफी घेताना प्रकाश काहीसा गप्प होता. वंदनाच्या लक्षात आलं की मनांत काहीतरी चालू असावं. इतक्या वर्षांच्या सहवासानं तिला त्याच्या स्वभावाची पूर्ण कल्पना आली होती. खरं तर तो अतिशय हुषार होता. चांगली समज होती. जाण होती. परंतु समाजात वावरताना तो अजूनही बुजत होता. कर्जतला असताना तिला विशेष जाणवलं नाही. परंतु ठाण्याला आल्यावर विशेषतः घोडबंदर रोडवरील कॉम्प्लेक्समध्ये आल्यावर तीव्रतेने जाणवलं. वस्ती कॉस्मॉपॉलिटन होती. वास्तविक मंडळी उच्च मध्यम वर्गातली होती. प्रकाशला पगार चांगला होता. सुशिक्षित होती परंतु बाकीची सर्व मंडळी वरच्या दर्जाची आहेत असं त्याला कायम वाटायचे. कारण एकच स्वतःच्या मनातला न्यूनगंड. वंदनाच्या लक्षात आलं होतं परंतु ती वेळ येईल तेव्हा समजावून सांगायची. ती त्याच्या मनाचा अंदाज घेत होती तेवढ्यांत प्रकाश म्हणाला,

'एक प्रॉब्लेम आहे म्हणजे त्याचं'

'मग आपण सोडवू तो'

'पण'

'काय करायचं आहे आणि तुम्ही मनावर घेतलंत तर काय होणार नाही.'

'तुझं म्हणजे'

'खोटं नाही. ए.एम.आय.ई.ची परीक्षा दिली त्यावेळी तुम्ही असंच म्हणत होता ना. जमणार नाही. मग एक एक विषय सोडवू म्हणालात आणि शेवटी सगळे विषय एकाच वेळी पार केलेत.'

'तू म्हणालीस म्हणून'

'म्हटलं मी, पण केलंत तुम्ही. मी होते निमित्तमात्र सारं श्रेय तुमचंच.'

'वंदना खरंच तुझ्यामुळेच.'

प्रकाशला बोलवेना मन भरून आलं.

'झाली का पुनः सुरुवात.'

'तसं नाही गं पण मला वाटतं की तू जर माझ्या जीवनात आली नसतीस ना तर माझं जीवन भरकटत गेलं असतं. माझा गोंधळ उडतो गं.'

'गोंधळ कशाला होईल. अहो लहानपणी मलाही असं वाटायचं की आपण काही करू शकणार नाही. पुण्याला जावून आलं ना म्हणजे वाटायचं की आपण फार मागासलेले आहोत. त्यावेळी आमच्या मास्तरांनी तुकाराम महाराजांचा एक अभंग सांगितला होता. मला तो नेहमी आठवतो. 'नाभी मृगाचे कस्तुरी, व्यर्थ हिंडे वनांतरी' ते म्हणायचे तुमच्याकडे सर्व आहे पण तुम्हाला ते ठावूक नाही. त्या हरिणाकडे कस्तुरी असून ते उगीच वनांत फिरतं कस्तुरीच्या शोधात. मला मात्र त्या अभंगाने चांगला मार्ग दाखवला! तुम्ही कशातही कमी नाही. आपल्या या कॉम्प्लेक्स मधल्या बऱ्याच मंडळींचा नुसता देखावा असतो. आपण स्वतः बद्दल बोलत नाही म्हणून लोकांना तसं वाटतं. आपल्या पूजाला प्रथम या मुलांनी टेबल टेनिसच्या बाबतीत टाळलं. मध्यंतरी मिसेस माथूर मला म्हणाल्या की पूजाला सांगा ना आमच्या पिंकीशी खेळायला?'

'खरं!'

'हो ना'

'पण मागे तर पूजाला येवू द्यायची नाही. आणि मलाही तसं वाटायचं.'

'शाळेतल्या स्पोर्टस मध्ये तिला कप मिळाला तेव्हा त्यांना मानावेच लागलं.'

वंदनाला वाटलं की ही वेळ चांगली आहे. मुलंही नाहीत. अशा एखाद्या वेळी ती त्याच्याशी खूप बोलत असे. प्रेमाने जिव्हाळ्याने त्याच्या मनावर फुंकर घालायची आणि त्याचवेळी त्याला बोलतं करायची. त्याच्या मनातलं शल्य जाणून घ्यायची. पण त्यावेळी ते जमलं नाही, तिने बोलणं चालू ठेवलं. हेतू एकच त्यानं मन मोकळं करावं. तेवढ्यात फोन वाजला वंदनाने घेतला.

'हॅलो'

'मै मोटवानी बोल रहा हूँ. आप भाभीजी बात कर रही है ना?'

'हां जी'

'नमस्ते भाभीजी'

'नमस्ते'

'साब आये नहीं होंगे तो रात को फोन करूंगा. वैसे तो...'

'नही नही, आये है उनको देती हूं.'

वंदनाने घाईघाईने सांगितले आणि मग फोन प्रकाशकडे दिला.

'हॅलो'

'यार प्रकाश'

'बोल मोटवानी... शाम को तो मिले थे.'

प्रकाश चटकन बोलून गेला आणि मग त्याच्या लक्षात आलं की आपण असं विचारायला नको होतं. पण तो अस्वस्थ असल्यामुळे तसं झालं होतं. मुख्य म्हणजे वंदनाच्याही ते लक्षात आलं. ती त्याचं बोलणं शांतपणे ऐकत होती.

'शाम को मिले थे मग बाद में खन्ना का फोन आया था.'

'कहां से, वो तो टोरोंटो.'

'वहीं बता रहा हूं वो इंडिया आया है और मुंबई में आनेवाला है. सबके बारे में पुछ रहा था और जब मैने उसको बताया अपने गेट टुगेदर के बारे में तो बहुत खुश हुआ और बोला की वो भी

आयेगा. ये बात तुम्हे बतानी थी.'

'अच्छा है...'

'मगर प्रकाश वो लेट आयेगा शाम सात बजे.'

'क्यों इतना लेट'

'उसकी मॅरेज ॲनिव्हर्सरी है और सुबह उसे ससूराल जाना है बांद्रा में. लेकीन आयेगा पक्का कहा है. सब एकसाथ मिलेंगे और वो भी कई महिनो के बाद. किसी भी हालत में वो पांच बजे के बाद बांद्रा से निकलेगा.'

'ठीक है.'

प्रकाशने फोन बंद केला. क्षणभर काहीच बोलला नाही.

'काय झालं?'

'काही विचारु नकोस. मला वाटतं की आता हॉटेलांतच पार्टी अरेंज केली पाहिजे.'

'कसली पार्टी'

'अगं आता आपली टर्न आहे ना'

'तुम्ही बोलला नाही'

'माझा विचार होता, हॉटेलात जायचं'

प्रकाशला मधेच उडवीत ती म्हणाली. आणि दोघंही हसले.

'तसं नाही गं'

'मग कसं'

'ही सगळी हाय फाय मंडळी त्यामुळे यांना बोलवायचं म्हणजे... सगळं ठीक होईल ना अशी काळजी वाटते.'

'न व्हायला काय झालं. पूर्वी जागा कमी होती पण आता मोठी जागा आहे. परिसर चांगला आहे. चार पैसे खर्च करणं शक्य आहे.'

'आणि आता त्यांत भर म्हणजे खन्ना आणि त्याची बायको येणार.'

'आणि त्याच दिवशी मॅरेज ॲनिव्हर्सरी आहे त्याची.'

'असू दे ना. आपण शुभेच्छा देवू या.'

प्रकाशच्या प्रत्येक प्रश्नाला वंदनाकडे उत्तर होतं. त्यालाही कळत होतं पण वळत नव्हतं. मनांत सारखी एकच शंका घोंगावत होती.

आपल्या घरी हे जमेल का?

वंदना हे सांभाळील का?

वंदनाने ह्याचं मन केव्हाच जाणून घेतलं होतं. तिच्या दृष्टीने त्याची भिती अनाठायी होती. ती केवळ न्यूनगंडापोटी निर्माण झाली होती. स्वतःला कमी लेखायची त्याची सवय वंदनाला ठावूक होती. तिचे कपडे साधेच असत. पण स्वच्छ आणि नीटनेटके, रंगसंगती लोभस असली तरी त्यांत दिखावूपणा नव्हता आणि भडकपणा तर मुळीच नसे. वंदना दहाजणींत नव्हे शंभर जणींत उठून दिसण्याएवढी निश्चित सुंदर होती. परमेश्वराने त्या बाबतीत जराही कंजूषपणा दाखवला नव्हता. त्यामुळे सौंदर्य प्रसाधानांची तिला विशेष गरज भासली नाही. लिपस्टिकची तर तिला मुळीच आवड नव्हती. गरजेचा विचार दूर. पण प्रकाशच्या मित्रांच्या बायका अगदी नटून थटून येत. शिवाय नव्या कॉम्प्लेक्स मधील बायका तर फॅशन परेडला निघाल्याप्रमाणे नटत असत. वंदनाचा मार्ग निराळा होता. आणि महत्त्वाचा मुद्दा म्हणजे त्या बाबतीत तिला न्यूनगंड अजिबात वाटत नसे. प्रकाशने आडवळणाने तिला काही गोष्टी सुचविल्या होत्या. हे शहर आहे. इथली रहाणी वेगळी आहे. सौंदर्य प्रसाधनांचा वापर सर्रास होतो. बायका ब्युटी पार्लरमध्ये जातात. पण वंदनानं ऐकून न ऐकल्यासारखं केलं. नव्या कॉम्प्लेक्समध्ये आल्यावर अनेकदा म्हणाला होता... तू जीन्स वापरलीस तरी मी काही म्हणणार नाही. पण त्यावर ती फक्त गोड हसली होती.

'कधी आहे गेट टुगेदर'

'बारा तारखेला. जेम तेम पंधरा दिवस आहेत.'

'भरपूर वेळ आहे. काय काय करायचं सांगा.'

'तुला जमेल ना.'

'हं'

'आपण ठरवूया. या लोकांकडे पार्टीच्या वेळी काय काय आणतात... पाहिलं आहेस ना तू.'

'हो पण आपण घरीच करू...'

'तुझी धावपळ दमणूक नाही होणार आणि आता दोन मेंबर वाढले. मिस्टर अँड मिसेस खन्ना.'

'सगळं व्यवस्थित करते बघा. या खन्नांच्या लग्नाला किती वर्ष झाली असतील.'

'पंधरा वर्ष'

'म्हणजे आपल्या नंतर'

'हो'

तेवढ्यांत दारावरची बेल वाजली. पूजा आणि सागर आले होते. सागर प्रकाशला चिकटला आणि शाळेत काय काय झालं ते सांगू लागला.

रात्री जेवण झाल्यावर पूजा आणि सागर थोड्या वेळाने झोपलीच पण प्रकाशही झोपला. त्याला काळजीने थकवा आला. होता. स्वयंपाक घरांत आवराआवर करताना तिने कानोसा घेतला. प्रकाश झोपला होता. तिने खोलीतला दिवा बंद केला. सर्व आवर आटप करून ती गॅलरीत येवून उभी राहिली. सातव्या मजल्यावरून रात्रीचं दृश्य सुंदर दिसत होतं. मघाशी झालेल्या बोलण्याचा विषय मनांत तरळला. नियोजित कार्यक्रम कसा काय पार पडेल या चिंतेने प्रकाशला ग्रासलं होतं. स्वभावाला औषध नव्हतं. कुठलाही कार्यक्रम असला आणि त्याची जबाबदारी अंगावर पडली म्हणजे काळजीला सुरुवात होते. दरवेळी वंदना सर्व

काही व्यवस्थित करीत असे आणि नंतर तो म्हणायचा... चला सर्व काही व्यवस्थित पार पडलं. पण वंदना हे सर्व तुझ्यामुळेच हं. खरंच मला तुझा केवढा आधार वाटतो. मला समजून घेतेस आपल्या संसारात काही काही कमी पडू देत नाहीस... ती फक्त म्हणायची चढवा मला हरभऱ्याच्या झाडावर अर्थात त्याच्या भावनांची तिला पूर्ण कल्पना होती. तिचे विचार वेगळ्या दिशेने वळले पार्टीला काय काय करायचं. याचा विचार सुरू झाला. बघता बघता कार्यक्रम निश्चित होवू लागला. लग्नानंतर काही दिवसांतच प्रकाशने तिला सर्वाधिकार बहाल केले होते. अर्थात त्यामुळे ती चढेल बनली नव्हती किंवा ती भावना तिच्या डोक्यांत गेली नव्हती. पाय कायम जमिनीलाच चिकटलेले होते.

एक एक दिवस जावू लागला तशी प्रकाशची अस्वस्थता वाढू लागली. एका बाजूला खात्री वाटत होती की वंदना सर्व काही व्यवस्थित पार पाडेल तरी मनांतली चिंता कमी झाली नव्हती. रोज तो विचारायचा की काही आणायचं आहे कां? वंदना फक्त हसायची. मग शेवटी त्याने पुनः विचारलं.

'मग मी काय करू.'

'कशाबद्दल'

'अग तू आखलेल्या कार्यक्रमांत माझी भूमिका काय आहे. माझ्याकरिता कोणतं काम ठेवलं आहेस. सगळी कामं तूच करायची म्हणजे.'

'मुख्य काम तुम्हीच करणार आहात.'

'कोणतं?'

'अहो पाहुण्यांना रिसीव्ह करायचं, त्यांचं योग्य प्रकारे आगत स्वागत... ते मला जमायचं नाही.'

मग मात्र प्रकाश हसला. नंतरच्या दिवसांत त्याने काहीही विचारलं नाही.

बारा तारीख उजाडली. वंदना पहाटेच उठली होती. कामाची आखणी मनांत झाली होती. कुठलाही गोंधळ नव्हता. मनांत संदेह नव्हता. जास्त लागणारी भांडी आदल्या दिवशीच तिने स्वच्छ करून ठेवली. लवकरच आंघोळी उरकल्या. सगळी मंडळी आठलाच तयार झाली. आधी दोन दिवस वंदनाने साफ सफाई केली होती. पडदे, कुशन कव्हर्स बदलल्यावर रोजची जागा नवीन वाटायला लागली. रविवार असल्यामुळे कॉम्प्लेक्समध्ये शांतताच होती.

नऊ वाजल्यावर वंदनाने अगरबत्ती लावली. दोन चार मिनिटांतच खोलीत मोगऱ्याचा सुवास दरवळला. नंतर सनईची टेप लावली. त्यामुळे वातावरण अधिकच प्रसन्न झाले. प्रकाश खुशीत होता. मनांतल्या मनांत तो म्हणाला, चला सुरुवात तर चांगली झाली.

साडे नऊ वाजता बेल वाजली. प्रकाशने दार उघडलं. समोर दीपक पटेल आणि त्याची पत्नी हर्षा उभे होते.

'वेलकम दीपक... आईये भाभीजी.'

'कैसे हो'

'एकदम मस्त'

त्याचं बोलणं चालू असतांनाच पूजा आणि सागर पुढे आले आणि 'गुडमॉर्निंग अंकल, गुडमॉर्निंग आँटी' असं म्हणून दोघांनाही गुलाबाचं फुल दिलं. तेवढ्यात वंदना स्वयंपाकघरातून बाहेर आली.

'नमस्ते भाभी जी.'

'नमस्ते'

'आपकी बडी दौडधूप हुई होगी. मैने हर्षा को कहा तुम जाओ मदत के लिये.'

दीपक वंदनाला म्हणाला. पण तिने लगेचच त्याला सांगितलं,

'ऐसी कोई जरूरत नही थी और गेस्ट को काम करने के लिये बुलाना गलत होगा... क्यों हर्षाबेन मैने ठीक कहा ना...'

'हम तो घरके लोग है... गेस्ट नही.'

हर्षाच्या बोलण्यावर सगळेच हसले आणि त्याचवेळी प्रधान दांपत्याचं आगमन झालं. त्यांचंही स्वागत झालं.

'या शोभाताई'

'काही मदत'

'नको, आत या आणि बसा...'

'उशीर नाही ना झाला आम्हाला...'

'छे छे आणि आज रविवार आहे.'

हर्षा आणि शोभा यांना घेवून वंदना स्वयंपाकघरात गेली. गप्पा चालू होत्या. हॉलमध्ये पुरुष मंडळी बसली होती. मोटवानीला थोडा उशीर झाला. दरवाजा दिपकनेच उघडला.

'आ गये सब' दारातून आत येताना त्याने विचारलं.

'बस तुम्हारा इंतजार कर रहे है.'

'यार मदन तुमने तो कहा था कि सावंत भी आनेवाला है.'

'मगर आऊंगा ऐसा उसने कहा था.'

'नेपाल के महाराजाने छोडा नही होगा.'

त्याच्या बोलण्यावर चांगलीच खसखस पिकली. माधुरी मोटवानी आंत गेली आणि म्हणाली.

'व्हॉलेंटियर चाहिये क्या...'

वंदनाने हसून उत्तर दिलं... 'ऑलरेडी आ चुके है.'

'तो अब कोई आनेवाला नही.'

'बिलकुल... बाहर ही बैठते है.'

मग सगळी मंडळी स्थानापन्न झाली. प्रकाशच्या या नव्या जागेत ही मंडळी प्रथमच आली होती. मदनला तो परिसर आवडला.

'प्रकाश ठाणं किती वाढलंय रे...'

‘बघ... ना’

‘क्यों दीपक कैसा है.’

त्याच्या ऐवजी मोटवानीने उत्तर दिलं.

‘यार प्रकाश तुम्हारा कॉम्प्लेक्स एकदम बढिया है. बाहर जरा भीड है, मतलब मेन रोडपर मगर अंदर शांत है.’

‘आजकाल सगळीकडे टॉवर झाले आहेत.’

‘दुरूस्ती खर्च किती आहे...’

‘तीनशे साठ...’

‘माय गॉड लेकिन पानी का प्रॉब्लेम’

‘बिलकुल नही’

‘स्टेशन से थोडा दूर है न...’

‘नॉर्मली हरेक का अपना अपना ट्रान्सपोर्ट है और उसके अलावा सोसायटी की चार पांच बस है वह चलती है.’

‘वंडर फूल.’

मोटवानी खुष होता.

‘और क्या फॅसिलिटीज्’

‘जिम है, क्लब हाऊस, स्विमिंग पूल, कम्युनिटी हॉल है.’

‘मोटवानी यह है ठाना’

प्रकाशने विचारल्यावर मदन म्हणाला,

‘वो नही आयेगा क्यों मोटवानी मगर एक बात है. यहाँ से उल्हासनगर नजदीक है.’

सगळे मनमोकळे हसले.

त्यांच्या गप्पा चालल्या होत्या. त्याच वेळी वंदना सोलकढीचे ग्लास घेवून आली. सर्वांना दिल्यावर प्रथम मोटवानी म्हणाला,

खरं म्हणजे ओरडलाच...

‘फॅन्टॅस्टिक प्रकाश क्या है ये...’

‘सोल कढी...’

‘सोल का ढी...’ कैसे बनाते है आणि मग तो आपल्या बायकोकडे वळून म्हणाला, ‘माधुरी देखो देखे क्या बनाया है, भाभीजी को पुछो कहा मिलता है.’

त्यावर वंदनाने खुलासा केला, ‘ये घर में बनाया है.’

‘रिअली! यकीन नही आता... भाभीजी एक ग्लास से अपना तो काम नही चलेगा.’

‘और देती हूँ’

असं म्हणून वंदना स्वयंपाकघरात गेली. प्रकाशला यापूर्वी झालेलं बोलणं आठवलं. तिने ज्यावेळी स्टार्टर म्हणून सोलकढी देण्याचा प्रस्ताव दिला त्यावेळी त्याने विरोध केला होता. असं करणं म्हणजे त्यांच्या दृष्टीने मागासलेपणाचं लक्षण होतं. पण प्रत्यक्षात काही वेगळंच घडत होतं. दुसरा घोट घेतल्यावर राज म्हणाला,

‘माधुरी तुम खाली कुकरी क्लास में जाती हो. अभी थाना आकर भाभीजी से सीख लो.’

पण शेवटी वंदनाच तिच्या मदतीला आली.

‘नही भाईसाब, माधुरीजी की प्रिपरेशन मैने टेस्ट की है. बढिया होता है.’

‘अरे भाभीजी कुछ नही. पार्टी मतलब केटरर को ऑर्डर देना यही काम है उसका.’

सर्व मंडळीत प्रधान दांपत्य वयानं मोठं होतं. त्यामुळे शोभा वंदनाला एकेरी नावानंच हाक मारीत असे.

‘वंदना खरंच चांगली झाली आहे. सोलकढी, आता पुनः तुझ्याकडून टिप्स घेतल्या पाहिजे.’

‘काय शोभाताई तुम्ही सुद्धा...’

‘अगं खरंच चविष्ट झाली आहे.’

प्रकाशला पुनः अवघडल्यासारखं झालं. वंदनाला त्याच्या चेहेऱ्यावर दिसणारी काळजी थोडी कमी झाल्यासारखी वाटली. दहा वेळा तरी त्याच्या मनात आलं होतं की एकदा सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडला म्हणजे सुटलो. त्याच्या दृष्टीने ही सर्व बडी मॉडर्न मंडळी होती. पण घडलं होतं वेगळं. सर्वांनी घरची तारीफ केली. सोफा कुशन्स, पडदे यांच मॅचिंग सगळ्यांच्या नजरेत भरलं. सर्वांनीच भरभरून स्तुती केली. पडद्यावरच भरतकाम वंदनाने केलं आहे. यावर विश्वास बसणं कठीण होतं.

साडेबारा वाजता जेवणाचा कार्यक्रम झाला. पदार्थ मोजकेच परंतु अत्यंत चविष्ट होते. खमणी हा गुजराथी पदार्थ तर सर्वांनाच आवडला. दीपक बायकोला म्हणाला, ‘हर्षा देखो क्या टेस्ट है. हमारे घर मे भी इतनी अच्छी नही बनती.’

त्यावर वंदना म्हणाली, ‘मैने हर्षाजी से ही सीखा है.’

‘नही नही ये आपका बडप्पन है.’

जेवण हसत खेळत झालं प्रत्येक जण आयोजनाची आणि सर्व पदार्थांची स्तुती करीत होते. या ग्रुपमध्ये वंदनाचं कसं होईल. ती कमी पडेल का? इंग्रजी संभाषणांत ती भाग घेवू शकेल का? प्रकाशच्या मनांत अशी प्रश्नांची लांबलचक रांग होती. कुणीही वंदनाला प्रश्न विचारला म्हणजे तो श्वास रोखून अस्वस्थ होत असे आणि तिनं सविस्तर आणि योग्य उत्तर दिल्यावर श्वास सोडत होता. प्रत्येक वेळी मनांत म्हणत होता अगं, हे वंदनाला ठावूक आहे. ती एक निराळीच वंदना त्या दिवशी तो पहात होता. केव्हा वाचलं तिने हे सारं आपल्याला कसं ठावूक नाही. इतक्या वर्षानंतरही आपण तिला समजू शकलो नाही.

जेवण झाल्यावर थोडी विश्रांती. त्यावेळी कुणीतरी पत्ते खेळण्याची टूम काढली. ब्रीज खेळायचा म्हटल्यावर प्रकाशच्या काळजाचा ठोका पुनः चुकला. स्वयंपाकघरात काही पदार्थ करणं ठीक होतं. पण ब्रीज म्हणजे... पण प्रकाशला आणखी एक धक्का बसला. वंदना अत्यंत सफाईने खेळली. मग मंडळी कॉम्प्लेक्सच्या

परिसरात फिरायला निघाली. वंदनाने बॅडमिंटन कोर्ट रिझर्व्ह केलं होतं. शोभा चांगली खेळत असे. माधुरी तर त्यांच्या सोसायटीची चॅंपियन होती. प्रथम शोभा आणि माधुरी खेळल्या. बाकीची मंडळी प्रेक्षक. त्यानंतर माधुरी म्हणाली,

'क्यों वंदना खेलेगी'

'आप तो चॅंपियन है'

'तो क्या हुआ... चलो'

शोभानेही सांगितलं.

'वंदना घे रॅकेट... मी बसते...'

प्रकाश बाजूलाच उभा होता. तो पुनः अवघडला. माधुरी मोटवानी चॅंपियन म्हणजे वंदना तिच्यापुढे उघडी पडेल ती नामुष्की टाळण्यासाठी तो माधुरीला म्हणाला, 'भाभी वैसे उसके पांव में मोच'

'भाईसाहब यह प्रतियोगिता नही है बस मजे के लिये खेलना है.'

आणि प्रकाश काही बोलण्यापूर्वीच वंदनाने रॅकेट घेतली. खेळ सुरू झाला. प्रकाश मनांत परमेश्वराची प्रार्थना करीत होता. पण प्रत्यक्षांत वेगळंच घडलं. वंदनाने माधुरीवर गेम दिला. प्रकाश बघतच राहिला. केव्हा शिकली ही खेळायला. आणि एवढं प्राविण्य कसं काय मिळवलं. सकाळपासून प्रत्येक क्षण तो नव्याने जगत होता. एका वेगळ्याच वंदनाला पहात होता. तिला आपण ओळखलं नाही हेच खरं. आणि तिच्याबद्दलचे आपले अंदाज चुकीचे ठरले आहे. एका दृष्टीने आपण तिचा अपमान केला आहे. अक्षम्य गुन्हा केला आहे. तो कमालीचा अस्वस्थ झाला.

'प्रकाश, सात बजने को आये. अभी खन्ना आयेगा. घर चलना चाहिए.'

मोटवानीच्या बोलण्याने त्याची विचार मालिका तुटली. त्याने वंदनाकडे पाहिलं ती माधुरीला सांगत होती.

'आपका पहला गेम बहुत अच्छा था...'

मंडळी बोलत बोलत घरापर्यंत आली. स्थानापन्न होतायत् तोच खन्ना पतीपत्नी हजर. आगत स्वागत झालं. बऱ्याच वर्षांनी गाठी भेटी पडल्या होत्या. प्रतिप्रश्न टाळ्यांची देवघेव. पुनः जुने दिवस आठवले. मंडळी स्थिरावल्यावर सतीश खन्ना म्हणाला, 'प्रकाश आय ॲम एक्ट्रीमली हॅप्पी अँड द क्रेडिट गोज टू यू... बहोत दिनो के बाद पुराने साथी मिले.'

'लेकिन तुम तो भाग गये.'

'तो अगला प्रोग्राम टोरोंटोमे होगा... चलो सब लोग कॅनडा...'

'लेकिन एअर टिकेट तुम्हे लेने पडेंगे... तुम तैय्यार हो क्या.'

'उसमें क्या मेरे साथही बुक करता हूँ.'

पुनः हसण्याने दिवाणखाना भरला. तेवढ्यात वंदनाने सर्वांना ज्यूस दिला. तिने घरीच केला होता. मोसंबी आणि संत्र्यापासून तिने तयार केला होता. खन्नाने घोट घेतला आणि तो ओरडलाच...

'हेमा ये टेस्ट करो और भाभीजी को पुछो कहा मिलता है और कौनसे कंपनी का है?'

'हेमाने विचारलं'

'वंदनाजी बताओ ना एकदम टेस्टी है.'

'लेकिन आपको'

'नाम बतोओ बस...' फार आग्रह झाल्यावर तिने सांगितलं, 'होम ज्यूस कंपनी.'

प्रथम कुणालाच कळलं नाही. खन्नाने नोटबुक आणि पेन काढलं आणि म्हणाला,

'मै लिख लेता हूँ.'

आणि वंदनाने त्यांच्याच घराचा पत्ता सांगितल्यावर सगळे बघत राहिले. मग तिने खुलासा केला.

'भाभीजी यकीन नही आता. सिंपली फॅन्टॅस्टिक हेमा तुम अपने को ज्यूस एक्सपर्ट समजती हो... तुमको बहुत सीखना है.'

पण वंदना मात्र म्हणाली की तिने हेमाने केलेले पदार्थ पूर्वी खाल्ले आहेत आणि त्याची चव अजूनही तोंडात आहे. हे सांगतांना तिने बरोबर आणलेली ट्रॉली पुढे ओढली. ती झाकलेली असल्यामुळे कुणालाच कळलं नाही. प्रकाशही कुतुहलाने पहात होता. कारण त्यालाही कल्पना नव्हती. कुणी काही विचारण्यापूर्वीच वंदना म्हणाली,

'आय रिक्वेस्ट एव्हेरीबडी टू कम फॉरवर्ड' आणि खन्ना पतीपत्नीकडे वळून म्हणाली, 'आप दोनो ट्रॉली के पास आईयेगा... प्लीज'

प्रकाश ऐकतच राहिला. किती सफाईदार इंग्रजी बोलत होती. सर्व मंडळी ट्रॉलीभोवती जमा झाली. प्रत्येकाच्या मनांत कुतुहल होतं. शेवटी वंदनाने आवरण दूर केलं.

आणि सगळे बघत राहिले.

ट्रॉलीवर एक अप्रतिम असा केक होता. वरती आयसिंगने लिहिलं होतं.

हे दृश्य फारच नयनमनोहर होतं. बोलण्याच्या ओघात सर्वजण खन्नाच्या लग्नाच्या वाढदिवसाबद्दल विसरले होते. प्रकाशला एकदम आठवलं वंदनाने विचारलं होतं की खन्नाच्या लग्नाला किती वर्षे झाली. मग वंदनाने मेणबत्ती लावली आणि सुरी खन्ना दांपत्याकडे दिली.

'गो अहेड खन्ना... मेनी हॅप्पी रिटर्नस्'

खन्नाला वाटलं की आपल्या सासुवाडीलाही एवढं कौतुक झालं नाही. तो गहिवरला. त्यांनी मेणबत्ती विझवली. सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या.

'केक बढीया है भाभीजी... क्यों खन्ना' मोटवानी म्हणाला.

'रिअली... थाना में भी ऐसा केक बनानेवाली बेकरी है.'

'वंदना कुठून आणलात आणि आयसिंगही छान केलं आहे. नाहीतर लेटरींग घाणेरडं असतं.'

शोभानेही आपलं मत नोंदविलं.

प्रकाश मात्र विचार करीत राहिला. या भागांत एक बेकरी त्याला ठाऊक होती पण ती छोटी होती मग वंदनाने कुठून आणला.

'बताईये बेकरी का नाम... मॉंगिनीज का है या और...'

आणि वंदनानं बॉंबच टाकला...

'आपटे बेकरी'

'मतलब'

'हमारे घर मे ही बनाया है.'

'क्या' खन्ना ओरडलाच, 'और ये आयसिंग डेकोरेशन...'

'मैने ही बनाया ठीक तो है?'

'अरे भाभीजी यकीन नही आता. प्रकाश यार यू आर द लकियेस्ट पर्सन...'

सर्वांनी टाळ्या वाजवल्या. विशेष कुणाला भूक नव्हती. त्यामुळे वंदनाने सर्वांना दहिवडे दिले. वरती कॉफी, प्रकाश गोंधळलेलाच होता. निघण्याचे वेध लागले. तेव्हा मोटवानी म्हणाला,

'भाभीजी, आज आपने हमे बढीया चीजे खिलायी.'

'आप लोगो को खाना पसंद आया ये ठीक है. नही तो मैं डर गयी थी आप लोग बडे बडे हॉटेल में जाते रहते है इसलिये...'

'गोली मारो वो फाईस्टार को आपका खाना सेव्हन स्टार है. मगर एक बात कहुंगा...'

'बोलिये.'

'एक बार खाकर तसल्ली नही हुई.'

वंदनाने हसून उत्तर दिलं.

'घर आपका है. आप लोग कभी भी आ सकते है. रात के खाने के लिये रुकना है तो अभी बोलो मै किचन मे जाती हूँ.'

सगळी मंडळी खळखळून हसली. तृप्त मनाने प्रसन्न आणि मनापासून एकमेकांचे निरोप घेऊन मंडळी निघाली. प्रकाश त्यांना निरोप देण्यासाठी घराबाहेर पडला.

वंदनाने घड्याळ्याकडे पाहिलं. पहिल्यांदा मुलांच्या गाद्या नीट केल्या. त्यांना झोपायला सांगितलं. ती ही दमली होती. केव्हाच झोपली. थोडी फार आवराआवर करायची होती. मुख्य म्हणजे अन्नाची झाकपाक करायची होती. डिशेस वगैरे बेसिनमध्ये टाकलेल्या होत्या.

सगळ्यांना निरोप देवून प्रकाश परत आला. डोक्यांत एकच विषय होता. वंदना, लग्नाला इतकी वर्षे झाली तरी आपण तिला ओळखू शकलो नाही. तिच्या क्षमतेची आपल्याला कल्पनाच आली नाही. कारण आपण त्याबद्दल विचारच केला नाही. आपण झगमगाटाला भुललो मालाच्या दर्जापेक्षा त्याच्या वेष्टनाचाच विचार करीत राहिलो. आलेल्या सर्व बायका कॉन्व्हेंट स्कूलमधल्या. परंतु फक्त देखावा. वेळ आल्यावर सगळ्या फिक्या पडल्या वंदनासमोर त्याला आठवलं. वंदना नेहमी म्हणते. आपण स्वतःला का म्हणून कमी लेखायचं. तिनेच आपल्याला रत्नागिरी बाहेर काढलं. ए.एम.आय.ई. परीक्षेला बसण्यासाठी प्रवृत्त केलं. चांगली नोकरी बदलण्यासाठी... प्रत्येक प्रसंग डोळ्यासमोरून सरकत गेला. तो मनाशी म्हणाला, वंदना आहे म्हणून मी आहे. एरव्ही माझी जीवन नौका कुठल्या कुठे भरकटली असती. वंदना म्हणजे आपल्या जीवनांतला मोठा ठेवा आहे. समाधान आहे. तृप्ती आहे आणि स्फूर्ती आहे. काही नाही यापुढे आपण तिच्यासाठी खूप वेळ दिला पाहिजे. त्याचं मन भरून आलं. द्रवलं... त्या मनस्थितीतच तो स्वयंपाकघराच्या दारात उभा राहिला. वंदना पाठमोरी होती. तिला कल्पनाही नव्हती, तिच्या मनात विचार होते दुसऱ्या दिवसाचे ऑफिस... मुलांच्या शाळा... चाहूल लागली म्हणून तिने मागे पाहिलं प्रकाश उभा होता.

'गेली मंडळी.'

'हं'

'सगळं ठीक झालं ना... मुलांनी पण खूप मदत केली... पूजा तशी समजूतदार आहे...'

प्रकाशचा चेहेरा भावूक झाला होता. क्षणाक्षणाला त्याला वाटत होतं की आपण वंदनावर अन्याय केला. हा कल्पवृक्ष आपल्या दारी आहे. याची जाणीवच झाली नाही. आणि वंदनाने त्याबद्दल कधी शब्दही काढला नाही.

प्रकाश तिच्याकडे एकटक पहात होता.

तिने विचारलं,

'काय पाहताय असं'

तो फक्त म्हणाला,

'वंदना'

पुढे काहीच बोलला नाही बोलणं शक्य नव्हतं. मग वंदनाच पुढे गेली आणि म्हणाली,

'चला बाकीची आवरा आवर करा. उद्या करीन, तुम्ही दमला असाल. दिवसभर धावपळ चालली होती. वाटलं तर उद्या रजा घ्या...'

वंदना बोलत होती. प्रकाशला वाटलं की तिला सांगावं की तूच दमली आहेस. गेले आठ दिवस तू सारखीच कामांत आहेस. मला कल्पना नव्हती.

त्याने बोलण्याचा प्रयत्न केला पण त्याला वाटलं की आपण बोललो तर आपल्याला रडू येईल. त्याने डोळे मिटून घेतले.

❖

# मराठे प्रतिष्ठानद्वारा गुणवत्ता पारितोषिके

• श्री. हेमंत अरुण मराठे, (पृ.२१), नालासोपारा भ्रमणध्वनी – ९८२२८४७१२०/९२२०६९९९५७

**मराठे प्रतिष्ठानद्वारा गुणवत्ता पारितोषिकांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल.**

१) इयत्ता ५ वी आणि इयत्ता ८ वी, प्राथमिक आणि माध्यमिक स्कॉलरशिप परीक्षा – इयत्ता ५ वी, रु. २००/–चे पारितोषिक, स्कॉलरशिप प्राप्त प्रत्येकाला.

सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ३००/–

इयत्ता ८वी – रु. ३००/–चे पारितोषिक, स्कॉलरशिप प्राप्त प्रत्येकाला

सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ४००/–

२) इयत्ता १० वी – ८५% ते ९०% गुण प्राप्त करणाऱ्यास रु. ८००/– ९०% पेक्षा जास्त रु. १०००/–

सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ५००/–

३) इयत्ता १२ वी –

आर्टस्/कॉमर्स :

७०% ते ८०%– रु. ७००/–

८०% ते ९०%– रु. ८००/–

९०% पेक्षा जास्त रु. १०००/–

सायन्स : ८०% ते ९०% – रु. ८००/–

९०% पेक्षा जास्त रु. १०००/–

सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ६००/–

४) पदवी – B.A., B.Com. B.Sc.,

सर्व ७५% पेक्षा जास्त गुण प्राप्त करणाऱ्यांस रु. १२००/–

५) पदव्युत्तर –M. A., M.Com., M.Sc.

प्रत्येक शाखेतील सर्वप्रथम २ विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. १५००/–

C.A., L.L.B., Enginear, Medical प्रत्येक शाखेतील सर्वप्रथम विद्यार्थ्यास रु. १५००/–

६) विशेष नैपुण्य, (नृत्य/कला/ अभिनय)

राज्य अथवा राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारप्राप्त, व्यक्तीस रु. १५००/–

याशिवाय देण्यात येणारी पारितोषिके पुढीलप्रमाणे.

- गणेश तांत्रिक पारितोषिके रु.५००/– तांत्रिक विषय घेऊन उच्च श्रेणी मिळवल्यास अथवा, १० वी नंतर तांत्रिक शाखेमध्ये प्रवेश घेणाऱ्यास
- इयत्ता १० वी बोर्डात हिंदी विषयामध्ये सर्वप्रथम – रु. १००/–
- इयत्ता १० वी बोर्डात इंग्लिश विषयामध्ये सर्वप्रथम – रु. ५००/–
- (लीला दिगंबर मराठे नाशिक यांनी हे पारितोषिक पुरस्कृत केले आहे.)
- नॅनोटेक्नॉलॉजी मध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास श्री. वा. ग. मराठे, पुणे यांनी एक स्कॉलरशिप पुरस्कृत केली आहे.
- वैदिक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यास कै. श्रीमती शालिनीताई मराठे, मुंबई यांनी एक स्कॉलरशिप पुरस्कृत केली आहे.
- श्री. प्रमोद मराठे ठाणे पुरस्कृत (कै. सौ. माधुरी प्रमोद मराठे स्मरणार्थ). दहावीत सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला.

यशस्वी व पारितोषिकपात्र विद्यार्थ्यांनी दि. १५ जुलै २०१९पर्यंत आपापल्या गुणपत्रिकांची प्रत मराठे प्रतिष्ठानच्या पत्त्यावर पोस्टाने अथवा info@marathepratishthan.org या ई–मेलवर पाठवावी. विजेत्यांची सूची या वर्षीच्या वार्षिक अहवालात प्रसिद्ध करण्यात येईल. तरी निकाल प्राप्त झाल्यावर लगेचच गुणपत्रिका पाठवाव्यात ही विनंती.

निकाल उशिरा लागले तर वरील मुदतीनंतर देखील गुणपत्रिका पाठविल्यास पारितोषिकांसाठी विचार होऊ शकेल. मात्र त्या परिस्थितीत प्रथम क्रमांकासाठीची पुरस्कृत पारितोषिके देणे शक्य होणार नाही. ऑगस्ट/सप्टेंबर २०२२ मध्ये होणाऱ्या या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पारितोषिकांचे वितरण करण्यात येईल त्यामुळे त्याच्या १० दिवस अगोदर पर्यंत येणाऱ्या गुणपत्रिकांचाच विचार पारितोषिकासाठी होऊ शकेल याची कृपया नोंद घ्यावी.

**ई–मेल : info@marathepratishthan.org**

♦


# साभार पोच



## साप्ताहिक 'किरात' १०० वा शताब्दी विशेषांक अंक

## १९२२–२०२२

• संपादिका : सौ. सीमा शशांक मराठे • पृष्ठसंख्या : १८१ • मूल्य : १५०/– रुपये




**पुस्तकाचे नाव :** तेजोभास्कर दामोदरपंत सावरकर
**लेखिका :** मंदाकिनी भट
**प्रकाशक :** ज्ञानजिज्ञासा प्रकाशन
**मूल्य :** १२०/– रुपये
**पृष्ठसंख्या :** ६२




**पुस्तकाचे नाव :** तेजोनिधी (स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे जीवन कार्य)
**लेखिका :** मंदाकिनी भट
**प्रकाशक :** ज्ञानजिज्ञासा प्रकाशन
**मूल्य :** १८०/– रुपये
**पृष्ठसंख्या :** १००

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२ • इ–मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**